“A HISTORY OF SILVER INDUSTRY IN HUPARI WITH SPECIAL REFERENCE TO CONTRIBUTION OF WOMEN”

हुपरीतील चांदी व्यवसायाचा इतिहास : विशेष संदर्भ स्त्रियांचे योगदान

विद्यापीठ अनुदान आयोगद्वारा अनुदानित लघु संशोधन प्रकल्प

(Minor Research Project)

No. F. 23- 1326/14 (WRO) 30 March 2015

Western Regional Office, Ganesh Khind, Pune 411007

संशोधक

डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले,

(M.A.,B.Ed.,Ph.D., qualified SET)

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,

रयत शिक्षण संस्थेचे,

चंद्राबाई – शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर - ४१६२०३

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत

मार्च २०२०

प्रतिज्ञापत्र

मी डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की, 'हुपरीतील चांदी व्यवसायाचा इतिहास : विशेष संदर्भ स्त्रियांचे योगदान' हा लघु संशोधन प्रकल्प (Minor Research Project) स्वत: लिहिलेला असून विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली अंतर्गत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे सादर करत आहे. सदर लघु संशोधन प्रकल्प अन्य कोणत्याही विद्यापीठास सादर केलेला नाही.

ठिकाण: हुपरी

डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले
संशोधक

CERTIFICATE OF HEAD OF THE INSTITUTION

This is to certify that Chandrabai – Shantappa Shendure College, Hupari Tal. Hatkanangale Dist. Kolhapur - 416203 is permanent affiliated college under section 2(f) and 12 (b) of UGC, Dr. Supriya Chandrashekhar Khole (Principal Investigator) is the regular and permanent faculty member of our college. Her minor research project **"A HISTORY OF SILVER INDUSTRY IN HUPARI WITH SPECIAL REFERENCE TO CONTRIBUTION OF WOMEN"** is the result of her own work. She prepared this minor research project after the approval of UGC. I also certify that she has not submitted this project to any other University or Institution for the award of any academic purpose.

Principal
Chandrabai -Shantappa Shendure College,
Hupari , Dist. Kolhapur

ऋणनिर्देश

विद्यापीठ अनुदान आयोग अनुदानित लघु संशोधन प्रकल्प सादर करत असताना ज्यांनी ज्यांनी मला मदत केली त्या सर्वांचे ऋण व्यक्त करणे हे मी माझे आद्यकर्तव्य समजते. मी प्रस्तावित केलेल्या विषयास मंजुरी देऊन संशोधनासाठी अनुदान देणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांची मी खूप आभारी आहे.

हा प्रकल्प करण्यासाठी प्रोत्साहन देणारी माझी मातृसंस्था 'रयत शिक्षण संस्था, सातारा', तसेच कॉलेजचे माजी प्राचार्य मा. डॉ. टी एस पाटील सर, प्राचार्या मा. डॉ. पी.बी. पाटील मॅडम यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य मिळाले. येथून पुढेही त्यांच्या मार्गदर्शनाची आणि सहकार्याची अपेक्षा करते. माझ्या कॉलेजमधील सर्व सहकारी प्राध्यापक व सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मला मिळाले त्यांच्या प्रति ऋण व्यक्त करते.

सदर प्रकल्पासाठी मला हुपरी गावाबरोबरच आसपासच्या गावातील चांदी व्यवसायाची माहिती हवी होती. त्यासाठी चांदी उद्योजक, धडी उत्पादक, विविध प्रकारचे काम करणाऱ्या कारागीर स्त्रिया, चांदी व्यवसायाशी संबंधित विविध संघटनेचे पदाधिकारी व इतर कर्मचारी या सर्वांनी वेळात वेळ काढून मला आवश्यक माहिती पुरवली. प्रत्यक्ष काम कसे चालते हे दाखविले, मुलाखतीद्वारे किंवा प्रश्नावली द्वारे माहिती दिली आणि आवश्यक असणारी कागदपत्रेही दिली या सर्वांचे मी ऋण व्यक्त करते. केवळ त्यांच्या सहकार्यामूळेच माझे हे संशोधन पूर्णत्वास जाऊ शकले.

ज्यांच्या शिवाय संशोधन कार्य केवळ अशक्य होते त्या माझ्या सर्व कुटुंबीयांची खूप आभारी आहे. शेवटी श्रीकांत कॉम्प्युटर्स कोल्हापूर यांचे आभार .

डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले
संशोधक

अनुक्रमणिका

प्रकरण क्रमांक	प्रकरणांची नावे	पृष्ठ क्रमांक
	प्रतिज्ञापत्र	I
	Certificate of the Head of the Institution	II
	ऋणनिर्देश	III
प्रकरण पहिले	प्रस्तावना	१ ते ६
प्रकरण दुसरे	हुपरी ऐतिहासिक आढावा :	७ ते १९
प्रकरण तिसरे	हुपरीतील चांदी व्यवसायाची सुरुवात आणि विकास	२० ते ४०
प्रकरण चौथे	स्त्रियांचे चांदी व्यवसायातील योगदान	४१ ते ५२
प्रकरण पाचवे	उपसंहार	५३ ते ५९
	संदर्भ ग्रंथ सूची	६० ते ६३
	परिशिष्टे	
	नकाशा १ हुपरीचे भौगोलिक स्थान	
	नकाशा २ हुपरी व परिसरातील चांदी व्यवसाय असलेली गावे	
	Questionnaire	
	फोटो	

प्रकरण पहिले

प्रस्तावना

प्रकरण दुसरे

हुपरी : ऐतिहासिक आढावा

प्रकरण तिसरे

हुपरीतील चांदी व्यवसायाची सुरुवात आणि विकास

प्रकरण चौथे

स्त्रियांचे चांदी व्यवसायातील योगदान

प्रकरण पाचवे

उपसंहार

संदर्भ ग्रंथ सूची

परिशिष्टे

नकाशा १ हुपरीचे भौगोलिक स्थान

नकाशा २ हुपरी व परिसरातील चांदी व्यवसाय असलेली गावे

Questionnaire

फोटो

प्रकरण 1 ले

प्रस्तावना

प्रस्तावना :

प्राचीन काळापासून सोने या मौल्यवान धातुप्रमाणे चांदीही मानवी आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिली आहे. सोने या धातूच्या खालोखाल समाजात चांदीला महत्त्व दिले जाते. चांदीचा दागिन्याबरोबरच नाण्यांसाठी, औद्योगिक क्षेत्रात आणि अगदी खाद्य पदार्थातही वापर केला जातो. थोडक्यात चांदीला भारतीय संस्कृतीत धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक त्याचप्रमाणे आरोग्याच्या दृष्टीनेही मूल्य मिळाले आहे. चांदीच्या दागिन्यांसाठी भारतातील इंदोर (मध्य प्रदेश), सेलम (तामिळनाडू), राजकोट (गुजरात), कटक (ओडिशा) इत्यादी ठिकाणे प्रसिद्धीस आली. याच परंपरेतील एक गाव म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील हुपरी हे होय. येथे निर्माण होणाऱ्या चांदीच्या दागिन्यांना संपूर्ण भारतातून मागणी आहे. दागिने बनविणाऱ्या पारंपरिक हस्तकलेची जोपासना हुपरीने आजपर्यंत केली आहे, त्यामुळे हुपरीची ओळख "चांदीनगरी किंवा रजतनगरी" म्हणून झाली आहे. हुपरीतील चांदी व्यवसायास आज शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. या व्यवसायात असणारी स्पर्धाही खूप वाढली आहे. मात्र येथील दागिन्यांना असणारी मागणी आजही आहे. हुपरीबरोबरच आसपासच्या इतर गावातील अनेक कारागीर या व्यवसायाशी जोडले गेले आहेत.

सुंदर आणि सुबक दागिने हे हुपरीच्या दागिन्यांचे प्रमुख वैशिष्टय आहे. हे दागिने तयार करताना विविध प्रकारच्या प्रक्रिया केल्या जातात. कच्ची चांदी वितळवणे ते दागिने बनविणे अशा कामासाठी कुशल, निमकुशल कारागीर यांची आवश्यकता असते. त्यांच्याकडून विविध टप्प्यातील कामे पूर्ण करून चांदीपासून सुबक दागिन्यांची निर्मिती केली जाते. यातील बरीचशी कामे स्त्रियांकडून पूर्ण केली जातात. व्यवसाय विकासाच्या सुरुवातीच्या टप्यात माट्या भरणे (चेन तयार करणे), घुंगरू भरणे अशी तुलनेने सोपी व प्राथमिक अवस्थेतील कामे स्त्रिया

करत तर जोडकामासारखी किचकट व कौशल्याची कामे पुरुष कामगार करत. मात्र हळूहळू स्त्रियाही कौशल्याची कामे करू लागल्या. विशेष म्हणजे ही कामे स्त्रियांना घरी करायला दिली जातात व त्या घरकाम आटोपल्यावर स्वत:च्या सवडीनुसार त्या पूर्ण करतात. कारखान्यात याच स्वरूपाचे काम करणाऱ्या कारागीरांना रजा, सुट्टी असे फायदे मिळतात ते यांना मिळत नाहीत. थोडक्यात त्यांच्याकडे व्यावसायिक कारागीर म्हणून बघितले जात नाही. पुरुष कारागीराप्रमाणे त्यांची नोंद होत नाही किंवा त्यांच्या संघटनाही नाहीत. अलीकडच्या काळात हुपरी परिसरातील तरुण वर्ग जवळच असणाऱ्या एमआयडीसीत मिळणाऱ्या नोकऱ्याकडे वळत आहे. अशावेळी चांदी उद्योजक स्त्रियांकडून कामे करून घेतो आहे. स्त्रियांच्या या योगदानाची दखल समाजाने घेतलेली दिसत नाही. हुपरीच्या चांदी व्यवसायातील स्त्रियांच्या योगदानाचा आढावा घेणे हा या लघु संशोधन प्रकल्पाचा (Minor Research Project) उद्देश आहे.

समस्या कथन: (Statement of Problem)

प्राचीन काळापासून भारतीय समाजाचे एक वैशिष्टय राहिले आहे ते म्हणजे सामाजिक विषमता. वर्णव्यवस्था–जाती व्यवस्थेबरोबरच येथे लिंगभेदावर आधारित विषमताही मोठया प्रमाणावर राहिली. पुरुषप्रधान भारतीय समाजातील राजकारण, धर्मकारण त्याचबरोबर अर्थकारणातही स्त्रीचे स्थान दुय्यम राहिले. घरातल्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळून स्त्रियांनी केलेले काम, घरातील सर्व जबाबदाऱ्यांना लावलेला हातभार अनुत्पादकच मानला गेला. पुरुषप्रधान क्षेत्रातही स्त्रियांचे योगदान मोठे असते. मात्र हे योगदान दुर्लक्षिले गेले. १९७५नंतर भारतात स्त्रीवादी चळवळींनी जोर धरला. यानंतरच्या काळात स्त्रियांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबरोबरच आर्थिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेतली जाऊ लागली, अभ्यास केला जावू लागला. सदर संशोधनात पुरुषप्रधान क्षेत्र मानल्या गेलेल्या हुपरीतील चांदी व्यवसायात स्त्रियांचे नेमके काय योगदान आहे याचा अभ्यास केला आहे.

आंतरविद्याशाखीय दृष्टीकोण (Interdisciplinary approach) :

प्रस्तुत संशोधन प्रकल्पास इतिहासाबरोबरच सामाजिक–आर्थिक दृष्टिकोनही आहे. स्त्रीवादाच्या भूमिकेतूनही या विषयाकडे बघता येते. थोडक्यात सामाजिकशास्त्रांच्या विविध विद्याशाखातून याचा अभ्यास होऊ शकतो. या लघु संशोधन प्रकल्पाचा विषय स्थानिक इतिहास प्रकारातही मोडतो. या शोध प्रकल्पाचा फायदा इतिहास विषयाच्या विद्यार्थ्याबरोबरच समाजशास्त्र, अर्थशास्त्र, स्त्री अभ्यास या विषयाच्या विद्यार्थ्याना आणि संशोधकाना होऊ शकतो.

राष्ट्रीय पातळीवरील स्थान (National status) :

विविध उद्योग–व्यवसायातील स्त्रियांचा सहभाग व त्यांचे आर्थिक योगदान या अभ्यासात आज राष्ट्रीय पातळीवर महत्त्व मिळत आहे या दृष्टीने या विषयास राष्ट्रीय महत्त्व आहे.

विषयाचे महत्त्व (Significance of the study) :

देशाच्या आर्थिक विकासासाठी स्थानिक बाजारपेठांचा विस्तार होणे आवश्यक आहे. स्थानिक बाजारपेठातील वैशिष्टयपूर्ण उत्पादन, या उत्पादनात सहभागी असणारे घटक, व्यवसाय विस्तारासाठी आवश्यक गोष्टींचा अभ्यास करणे आज खूप गरजेचे आहे. अशा अभ्यासानंतर त्यामध्ये बदल करता येतात. हे संशोधन हुपरीतील स्त्रियांच्या चांदी व्यवसायातील आर्थिक योगदानाची व त्यांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीबाबत माहिती देईल. स्त्री कारागिरांच्या बाबतीत ठरवावयाची धोरणे व चांदी व्यवसायाच्या विकासासाठी संशोधन मार्गदर्शक ठरू शकेल.

विषयाशी संबंधित संशोधनाचा आढावा (Review of related literature):

हुपरी विषयी आणि हुपरीतील चांदी व्यवसायाची माहिती देणारी काही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्याचप्रमाणे काही संशोधन प्रबंधही सादर झाले आहेत.

१) महाराष्ट्राची कलानगरी हुपरी (१९६६) : बापूसाहेब नाईक आणि आप्पासाहेब पाटील यांनी संपादित केलेले हे पुस्तक १९६६साली प्रसिद्ध झाले. तत्कालीन हुपरी विषयी बरीच माहिती यात दिलेली आहे. हुपरीचा इतिहास, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकास, महत्वाच्या सामाजिक संस्था इ. माहिती देणारे लेख यामध्ये आहेत. त्याचबरोबर हुपरीतील चांदी व्यवसायाची माहिती यामध्ये मिळते .

२) **Nitin Shantinath Badde, Impact of Silver industry on socio – economic development of Hupari and its Hinterland –** अप्रकाशित एम. फील. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर : या भूगोल विषयातील अप्रकाशित प्रबंधात हुपरी आणि परिसरातील चांदी व्यवसायाचे सामाजिक, आर्थिक परिणाम या विषयी संशोधन मांडले आहे. यासाठी प्रामुख्याने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

३) महादेव शिंदे, विसाव्या शतकाच्या विशेष संदर्भात कोल्हापूर शहरातील सुवर्ण आणि रौप्य उद्योगाचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जून २०१०: सदर प्रबंधात कोल्हापूर शहरातील सुवर्ण आणि रौप्य उद्योगाचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. यामध्ये हुपरी विषयी थोडक्यात माहिती दिली आहे.

या सर्व प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्याचा आढावा घेतला तर हुपरीतील चांदी व्यवसायातील स्त्रियांच्या योगदानाचा स्वतंत्रपणे आढावा घेतलेला नाही असे दिसते. या लघूशोध प्रकल्पाद्वारे हे संशोधन प्रथमच केले जात आहे.

विषयाची उद्दिष्टे (Objectives) :

१ हुपरीतील चांदी व्यवसायाच्या इतिहासाचा आढावा घेणे.

२ चांदी व्यवसायाच्या विविध टप्प्यातील विकासाचा आढावा घेणे.

३ हुपरीतील चांदी व्यवसायाच्या वेगळेपणाचा व वैशिष्टयांचा आढावा घेणे.

४ या व्यवसायात सहभागी स्त्रियांच्या योगदानाचा आढावा घेणे.

५ स्त्री कारागिरांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

६ स्त्री कारागिरांच्या सामाजिक – आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

पद्धती शास्त्र (Methodology):

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर केला असून स्त्रीवादी विश्लेषणाची पद्धत वापरली आहे त्याप्रमाणे गरजेप्रमाणे प्रश्नावली, मुलाखत इत्यादी तंत्राचाही वापर केला आहे.

संदर्भ साधने (References):

बॉम्बे प्रेसिडेन्सी गॅझेटियर, कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, कोल्हापूर जिल्हा सामाजिक –आर्थिक अहवाल, चांदी असोसिएशन वार्षिक अहवाल, हुपरीबाबत माहिती देणारी पुस्तके, विविध दैनिकातून प्रसिद्ध झालेली माहिती, बातम्या, विशेष प्रसंगी प्रसिद्ध स्मरणिका, व्यक्ती विशेष स्मरणिका, पुस्तके, कारागीर स्त्रिया व चांदी उद्योजकांच्या मुलाखती, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, वेबसाईटवर उपलब्ध असणारी माहिती या व इतर मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील उपलब्ध संदर्भ साधनांचा वापर सदर संशोधनासाठी केला आहे.

गृहितके (Hypothesis) :

१) हुपरी व आसपासच्या परिसरातील स्थानिक उद्योजकतेला चालना देण्याचे कार्य व हजारो स्त्री –पुरुषांना रोजगार मिळवून देण्याचे कार्य या व्यवसायाने केले आहे.

२) हुपरी व आसपासच्या परिसरातील हजारो कुटुंबे अर्थाजनासाठी या व्यवसायावर अवलंबून आहेत.

३) कच्ची चांदी ते चांदीचे दागिने या किचकट आणि प्रदीर्घ प्रक्रियेतील अनेक कामे आज स्त्रिया पूर्ण करत आहेत. थोडक्यात कुशल कारागीरांची गरज त्यांच्याकडून भागवली जात आहे.

४) घरातल्या अर्थव्यवस्थेत स्त्रियांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे.

५) स्त्रिया पारंपरिक पद्धतीने हे ज्ञान घेतात. त्याच्यासाठी विशेष असे कोणतेही प्रशिक्षण दिले जात नाही.

६) स्त्रियांना यातून मिळणारे उत्पन्न हे घरखर्चासाठी हातभार लावणारे ठरते मात्र आर्थिक प्रगतीची क्षमता त्यामध्ये नाही. थोडक्यात स्त्रियांना या व्यवसायातून शाश्वत उत्पन्नाची हमी मिळत नाही.

७) स्त्रियांच्या क्षमतेचा पूर्ण व योग्य प्रकारे वापर होत नाही.

भौगोलिक माहिती –

हुपरीचे भौगोलिक स्थान–उत्तर अक्षांश १६°३७′, पूर्व रेखांश ७४°२३′, समुद्रसपाटीपासून ऊंची ५७४ मीटर महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यात हातकणंगले तालुक्यात वसलेले हे हुपरी गाव. कोल्हापूर शहराच्या आग्नेय दिशेस साधारणपणे पंचवीस किलोमीटर अंतरावर आहे.

हुपरीची लोकसंख्या –

अ.नं.	वर्ष	लोकसंख्या
१	१९५१	७,०३९
२	१९६१	१०,००१
३	१९७१	१३,०५४
४	१९८१	१७,११२
५	१९९१	२०,९८७
६	२००१	२८,२६५
७	२०११	२८,९५३

हुपरीचे प्रशासन :

एकोणीसाव्या शतकात हुपरी कोल्हापूर संस्थांनाचा भाग होते. हुपरीचा समावेश या काळात आळते पेटयात (सध्याचा हातकणंगले तालुका) होता. १९२७ मध्ये येथे ग्रामपंचायत स्थापन झाली. १ मार्च १९४९ मध्ये कोल्हापूर संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले आणि कोल्हापूर जिल्ह्याची निर्मिती झाली तेंव्हा हुपरी कोल्हापूर जिल्ह्याचा भाग बनले. २०१७ पर्यंत येथील प्रशासन व्यवस्था ग्रामपंचायत सांभाळत होती. एप्रिल २०१७ मध्ये येथे नगरपरिषदेची स्थापना झाली.

प्रकरण 2 रे
हुपरी: ऐतिहासिक आढावा

हुपरी व परिसराचा ऐतिहासिक आढावा :

या प्रकरणात हुपरी आणि परिसरात घडलेल्या महत्वाच्या घटनांचा, त्याचप्रमाणे सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक संस्थांच्या निर्मिती आणि कार्याचा आढावा घेतला आहे. या घडामोडींचा हुपरीच्या जडणघडणीवर त्याचप्रमाणे चांदी व्यवसायाच्या विकासावर परिणाम झाला.

हुपरीची ग्रामदेवता श्री अंबाबाई –

हुपरी गावच्या निर्मितीबाबत असे सांगितले जाते की तेराव्या – चौदाव्या शतकाच्या दरम्यान विजापूर ते कोकण असा प्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या तात्पुरत्या मुक्कामाचे ठिकाण हुपरीपासून अडीच कि.मी. वर असलेल्या पंचगंगेच्या पश्चिम तीरावर होते. कालांतराने हे लोक कायमस्वरूपी त्या ठिकाणी वस्ती करून राहू लागले. हीच हुपरीची मूळ वसाहत असावी. पुढे श्री अंबाबाईच्या स्थापनेनंतर त्या भागात पुनर्वसाहत वाढून आजच्या हुपरीची निर्मिती झाली असावी. या भागात जंगल होते. याचा पार्क म्हणून उल्लेख केला जात होता. एकोणीसाव्या शतकात हा भाग कोल्हापूर संस्थांनाच्या ताब्यात आला. राजर्षि छत्रपती शाहू महाराजांनी आपली विधवा सून प्रिन्सेस इंदुमतीदेवी यांच्या नावाने हा पार्क केला होता. इंदुमती पार्क याच नावाने आजही हा भाग ओळखला जातो.

चांदीनगरी म्हणून प्रसिद्धीस येण्या अगोदरपासून हुपरी श्री क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. श्री अंबाबाईच्या वास्तव्याने पुनीत झालेले हे गावच या मंदिराच्या भोवती वसले गेले. एका टेकडीवर तटबंदीयुक्त गढीमध्ये हे मंदिर बांधले. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराचे बांधकाम कधी झाले याचा नेमका उल्लेख सापडत नाही. याच अंबाबाईच्या गढी भोवती हुपरी गावाचा विकास होत गेला.

सहा बुरूजांची भक्कम अशी तटबंदी, दोन प्रवेशद्वार, उत्तरेकडच्या मुख्य प्रवेशद्वारावर नगारखाना ही वैशिष्टये आजही पाहायला मिळतात.

श्री अंबाबाईच्या मूर्तीबद्दल एक आख्यायिका सांगितली जाते. इचलकरंजी शहराजवळच्या चंदूर गावाजवळ असलेल्या पंचगंगा नदीच्या पुरात ही मूर्ती वाहत आली. नदीच्या अलिकडील भागात हुपरीतील ग्रामस्थांची शेती होती ते आणि हुपरीतील काही ग्रामस्थ ही मूर्ती पाहण्यासाठी गेले. त्यानंतर ही मूर्ती ताब्यात घेण्यावरून चंदुर आणि हुपरीतील ग्रामस्थांचा वाद निर्माण झाला. शेवटी एक तोडगा काढण्यात आला, त्यानुसार एक गाडा आणून त्यात ही मूर्ती ठेवण्यात आली. या गाडयास घोडा जोडला गेला. तो घोडा ही मूर्ती कुठे नेईल तेथे या मूर्तीची प्रतिष्ठापना करावी असे ठरले. त्या घोडयाने फिरत फिरत ही मूर्ती हुपरीत आणली आणि तिथेच मूर्तीची स्थापना झाली. चंदूरच्या पाटलांचा पूजेचा मान मान्य करण्यात आला. त्यानुसार नवरात्र, यात्रा इत्यादी प्रसंगाच्यावेळी चंदुर गावातून वस्त्र– नैवैद्य आजही येतो.

देवीच्या मूर्तीचे वैशिष्टय म्हणजे सुरुवातीच्या काळात देवीला चांदीच्या मिशा होत्या. कोणी भक्ताने नवस फेडण्याकरिता देवीला अर्पण केल्या असाव्यात असे काहींचे म्हणणे आहे तर काहींच्या मते देवीने पुरुषांचा वेश धारण करून अनेक दैत्यांना ठार केले होते, त्यानंतर भक्ताच्या विनंतीनुसार ती याच रुपात तेथे राहिली. २४/८/१९९५ मध्ये या मूर्तीवर वज्रलेप करण्यात आला. त्यासाठी मूर्ती हलविण्यात आली. त्यावेळी तेथे शिवलिंग आढळून आले. शिवलिंगावर खोबण करून ही मूर्ती उभी करण्यात आली होती. मूर्तीच्या वज्रलेपाच्यावेळी कर्नाटकातील निडसोशी मठाचे जगद्‌गुरू निजलिंगेश्वर स्वामीजी यांच्या सांगण्यानुसार मिशा काढून टाकण्यात आल्या. शिवलिंग दिसेल अशाप्रकारे मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात आली. अत्यंत सुंदर, तेजस्वी रुप लाभलेली ही देवी समस्त हुपरीवासियांबरोबरच महाराष्ट्रातल्या अनेकांचे श्रद्धास्थान आहे. श्री अंबाबाईची मूर्ती महिषासूरमर्दिनी रूपातील असून तिला चार भुजा आहेत. शंख, त्रिशूल, कट्यार

धारण केलेल्या देवीच्या पायाशी महिषासूर आहे. शिवलिंगातून प्रकट झालेली माता हे शिवशक्तीचे रूप आहे. प्रा. आर. जी. घुले यांच्या मते हुपरीच्या अंबाबाईची मूर्ती ही मूर्तिशास्त्रानुसार शैव व शाक्त पंथाच्या सम्मिलीकरणाचे रूप आहे. त्याचप्रमाणे अंबा वा अंबू हे शब्द जल वाचक आहेत. ज्यापासून अंबाबाई हा शब्द तयार झाला त्यामुळे ती मातृदेवता – जलदेवता ही ठरते. प्रत्येक वर्षी माघ महिन्यातील अनुराधा नक्षत्र ज्या दिवशी येते त्यादिवशी देवीची वार्षिक यात्रा भरते. यावेळी त्याप्रमाणे नवरात्रीच्या काळात येथे मोठे उत्सवाचे वातावरण असते. हजारो भक्त येथे येऊन दर्शन घेतात.

श्री अंबाबाई मंदिराच्या भव्य आवारात बिरोबा, लक्ष्मी, कृष्ण, गणपती, नवग्रह, बालाजी यांची आकाराने लहान पण सुबक अशी मंदिरे आहेत.याच आवारात छोटे स्टेज (खुले नाटयगृह) आहे. येथे विविध कार्यक्रम सादर होतात. याच्या समोरच कुस्त्यांचे गोलाकार मैदान असून यात्रेच्या वेळी कुस्त्यांचे फड आयोजित केले जातात. येथे मैदानाभोवती कुस्त्या पाहण्यासाठी स्टेडीयमसारखी पायऱ्यांची रचना केलेली असल्यामुळे प्रेक्षकांना अतिशय उत्तमरित्या नाटक आणि कुस्त्या पाहता येतात. अंबाबाईचे मंदिर हे केवळ धार्मिक केंद्र नसून ते हुपरी गावाचे सामाजिक आणि सांस्कृतिक केंद्रही आहे. हुपरीत अंबाबाई मंदीरा इतकेच जुने महादेवाचे मंदिर आहे. अंबाबाई मंदिरापासून जवळच चिटणीस चौकात हे मंदिर आहे

हुपरी परिसरातील स्वातंत्र्यलढा :

हुपरी परीसर जरी कोल्हापूर संस्थांनाचा भाग असला तरी येथेही पारतंत्र्याविरोधात मोठी जागृती झाली. महात्मा गांधींनी ब्रिटिश भारतात चालविलेल्या विविध आंदोलनाचा परिणाम होऊन येथील लोक त्यात सक्रिय सहभागी झाले. ब्रिटीशांना विरोध केला जाऊ लागला. १९३९ मध्ये हुपरीतील शाळेतील मुलांनी तिरंगा ध्वज घेवून गावातून प्रभात फेरी काढली. याचवर्षी हुपरीतील मुख्य चौकात विदेशी मालाची होळी करण्यात आली, सरकारचे

प्रतिनिधी असणाऱ्या गावकामगार पाटलांच्या मुलानेही यावेळी आपला वुलनचा सदरा होळीत टाकला. हा मुलगा पुढे जेष्ठ गांधीवादी नेते एल.वाय. पाटील म्हणून प्रसिध्द झाले. १९४२ च्या क्रांतिलढयास देशभरात सुरुवात झाली. याच दरम्यान तत्कालीन प्रसिध्द किर्तनकार तुकाराम बुवा तासगांवकर यांचे हुपरीत आगमन झाले. त्यांनी आपल्या किर्तनातून धार्मिक कथाच्या आवरणाखाली देशभक्तीचे धडे येथील तरुणांना द्यायला सुरुवात केली. हुपरीतील अनेक तरुणांना आंदोलनासाठी प्रेरित करण्याचे महत्वपूर्ण कार्य या किर्तनांनी केले. देशभक्त रत्नाप्पा कुंभार, बाबासाहेब खंजिरे यांचेही मार्गदर्शन या तरुणांना मिळाले.

पार्क बंगला जाळला :

हुपरी, सांगावच्या परिसरातील जंगलाचा विस्तीर्ण भाग हा इंदुमती पार्क म्हणून ओळखला जात होता. करवीर संस्थानाच्या ताब्यात असलेला हा भाग शिकारीसाठी राखीव ठेवला होता. येथे दोनशे लोक राहू शकतील असा एक बंगला बांधला होता. संस्थानिक, इंग्रज अधिकारी, सरदार मंडळी, येथे शिकारीसाठी येत. खास शिकारीसाठी हे जंगल बंदिस्त करुन घेतले होते. येथील रानडूकरे, हरणे इ. प्राणी गावकऱ्यांच्या शेतीची नासधूस करीत. शिकारीसाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांचा मुक्काम पार्क बंगल्यात असे. संस्थांनिकांच्या आणि ब्रिटिश अधिकारांच्या शिकारीचे हे ठिकाण होते. प्रत्येक शिकारीच्या वेळी हाकारे देण्यासाठी हुपरी, रेंदाळ, सांगावच्या खेडूतांना जबरदस्तीने नेले जात असे. त्यांना या कामाची मजूरी मिळत नसे. करवीर दरबारी याबाबत तक्रार करुनही दाद घेतली जात नव्हती. अन्यायाचा प्रतिक असणारा हा पार्क बंगला जाळण्याचे येथील क्रांतिकारक तरुणांनी ठरवले.

९ जानेवारी १९४३ रोजी श्री अंबाबाई यात्रेनिमित्य 'पंताची सुन' या नाटकाचे आयोजन या देवळाच्या पटांगणात केले होते. हीच रात्र क्रांतिकारकांनी या कामासाठी निवडली. याबाबतचे नियोजन अगोदरच केले गेले. पार्क बंगला जाळण्यासाठी आवश्यक त्या साहित्याची जमवाजमव करुन त्याचप्रमाणे दगड भरुन

घेऊन अनेक तरुण बंगल्याजवळ गेले. सर्वांनी निळया पट्टया तोंडावर बांधल्या होत्या. सांगाव परिसरातील तरुणही यावेळी येथे याच कामासाठी आले होते. तेथे असलेल्या तीन रखवालदारांना डांबून ठेवले गेले. सर्व फर्निचर व साहित्य एकत्रित करुन आग लावली गेली. या कार्यात रत्नाप्पा कुंभारांबरोबर कार्य केलेले आनंदा गाट, आप्पा मांगूरे, पोपट शिकलगार, दत्तोबा जाधव, राम बडवे, आप्पू आक्कोळे, शंकर चिटणीस इ.तरुण सहभागी झाले. अन्यायाचे प्रतिक असणारा पार्क बंगला जाळला गेला. पोलीस यंत्रणेने या कटात सहभागी असणाऱ्या काही तरुणांना पकडले. शंकर चिटणीस व अन्य काही तरुणांना पकडून कोल्हापूरच्या सेंट्रल जेलमध्ये ठेवण्यात आले. अन्य साथीदारांची नावे सांगण्यासाठी त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. शंकर चिटणीस या छळामुळे आजारी पडले व ६ एप्रिल १९४३ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. हुपरीतील स्वातंत्र्य चळवळीतील पहिला हुतात्मा होता. अन्य तरुणांना कैदेची शिक्षा सुनावली गेली. उदा. विष्णुपंत वासुदेव देशपांडे यांना साडेसात वर्षाची शिक्षा झाली. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हांच त्यांची सुटका झाली.

हुपरी चावडी जाळली : –

अन्यायी सत्तेचे प्रतिक म्हणून चावडीकडे बघितले जात होते. चळवळीतील लोकांना पकडून चावडीत जबर मारहाण केली जात असे. हुपरी व सांगावचे तरुण यासाठी एकत्र आले. गवताच्या पेंड्या, रॉकेल गोळा केले गेले. चावडीत सनदी नोकर बंदूक घेवून होता. त्याच्याकडून बंदूक व चावडीतील तलवारी क्रांतीकारकांनी ताब्यात घेतल्या. गवताच्या पेंड्या, चावडीत जागोजागी ठेवून रॉकेलचे बोळे फेकून आग लावली गेली आणि हुपरीची चावडीही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. चावडीतील एका नोकराने केलेल्या तलवार हल्यात भीमराव भोजे यांची करंगळी तुटली. या गटाने पोस्ट ऑफीसवर हल्ला करुन तेथील रेकॉर्डही जाळले, दारुगुत्त्यावर आक्रमण करुन दारु रस्त्यावर ओतून दिली व यानंतर सर्व क्रांतिकारक तेथून भूमिगत ठिकाणी पसार झाले. यात सहभागी

असणारे हुपरीचे गोपाळ तेली यांना पोलीसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी बरीच धावपळ करावी लागली. यामुळे त्यांची तब्येत बिघडत गेली व त्यांचा मृत्यू झाला.

स्त्रियांचा स्वातंत्र्यलढयात सहभाग :

या परिसरातील स्त्रियांनीही १९४२ च्या स्वातंत्र्यलढयात योगदान दिले. रेंदाळ येथील क्रांतिकारक पितांबर माळवदे यांच्या पत्नी सौ. लिला माळवदे या पतीबरोबरच क्रांतिकार्यात सहभागी झाल्या. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी कोल्हापूरच्या रेसिडन्सी बंगल्यावर महिलांनी मोर्चा काढून तिरंगा फडकवला. यात त्यांचा सहभाग होता. रेंदाळ येथे पिकेटींग मोर्चेही त्यांनी काढले. दारुच्या दुकानातील दारुचे पिंप फोडल्याबद्दल त्यांना कोर्टासमोर जावे लागले. सोनाबाई सुतार, कृष्णाबाई बाळू पाटील यांनीही पिकेटींगमध्ये भाग घेतला. क्रांतिकारकांची हत्यारे लपविणे, दुसरीकडे नेऊन पोहोचते करणे, निरोप देणे इ.कार्येही त्यांनी केली. या तिघींनाही रेसिडेन्सी बंगल्यावर काढलेल्या मोर्चाबद्दल सक्तमजूरीची शिक्षा झाली.

हुपरी व परिसरातील क्रांतिकारकांनी १९४२च्या लढयात महत्वपूर्ण योगदान दिले. या परिसरातील क्रांतिकारकांचे कार्य, काही जणांनी पत्करलेले हौतात्म्य यामुळे महाराष्ट्र सरकारतर्फे हुपरीत 'हुतात्मा स्मारक' उभा केले गेले जे देशप्रेमाची आजही साक्ष देत आहे.

हुपरीचा शैक्षणिक विकास :

१६ डिसेंबर १८७० रोजी हुपरी येथे प्राथमिक शाळा सुरू झाली. कालांतराने डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्डाच्या ताब्यात कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळा आल्या. हुपरीच्या शाळेचे संचलनही यांच्याकडून केले जाऊ लागले. पहिली ते सातवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय येथे उपलब्ध होती. शाळेच्या परिस्थितीत सुधारणा होत गेली. कुमार विद्या मंदिर या नावाने ओळखली जाणारी ही शाळा आज केंद्रीय प्राथमिक शाळा म्हणून प्रसिद्ध आहे. दीडशे वर्ष पूर्ण करणाऱ्या शाळेचे व्यवस्थापन आज जिल्हा परिषदेकडून केले जाते. १९६० मध्ये मुलींसाठी

स्वतंत्र प्राथमिक शाळा सुरू करण्यात आली. या शिवाय उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळेची सोयही हुपरीत उपलब्ध होती.

हुपरीत सातवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय होती. त्यापुढचे शिक्षण घेण्यासाठी कोल्हापूर, इचलकरंजी किंवा कागल येथे जावे लागत असे. बाहेरगावी जाऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबत असे. १९५२ साली रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील हुपरीत आले होते त्यावेळी श्री. पारिसाण्णा इंग्रोळे, श्री. आप्पासाहेब नाईक, श्री. य. रा. नाईक, श्री. एल. वाय. पाटील इ. मंडळी त्यांना भेटली आणि त्यांच्या प्रेरणेने १९५३ मध्ये हुपरी इंग्लिश स्कूलची सुरुवात झाली. सुरूवातीला अंबाबाई देवळाच्या पटांगणात असलेल्या खोल्यांमध्ये वर्ग भरत होते. १९५७ साली या हायस्कूल मधून मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यांची पहिली तुकडी बाहेर पडली. सुरूवातीला ही मुलामुलींची सहशिक्षण देणारी शाळा होती. १९६४ मध्ये या शाळेची नवी इमारत बांधली गेली. १९६५ पासून मुलींसाठी स्वतंत्र हायस्कूल सुरू केले गेले. नवीन हायस्कूल इमारत मुलांसाठी आणि अंबाबाई देवळाच्या पटांगणात असलेल्या खोल्यांमध्ये मुलींचे हायस्कूल सुरू झाले. या मुलींच्या हायस्कूलचे नामकरण श्री लक्ष्मीदेवी गर्ल्स हायस्कूल असे करण्यात आले. हुपरी इंग्लिश स्कूल मध्ये तंत्र शिक्षणाची सोयही करण्यात आली आणि या शाखेला जोडूनच कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे ज्युनिअर कॉलेजचे वर्ग सुरू करण्यात आले. या कॉलेजचे नामकरण श्री. पारिसाण्णा इंग्रोळे ज्युनिअर कॉलेज असे करण्यात आले. १९९१ मध्ये रयत शिक्षण संस्थेने येथे महाविद्यालय सुरू केले. बारावी नंतरचे शिक्षण घेण्यासाठी बाहेरगावी जाण्याची परिस्थिती नसलेल्या पंचक्रोशीतील अनेक मुलामुलींच्या उच्च शिक्षणाची सोय या महाविद्यालयामुळे झाली. १९८० नंतर हुपरीमध्ये विविध शैक्षणिक संस्थांनी इंग्रजी, सेमी – इंग्रजी, मराठी, उर्दू अशा विविध माध्यमांच्या शाळा, कॉलेज सुरू केले आहे . हुपरी बरोबरच आसपासच्या गावातील, वाड्या वस्त्यातील मुले –मुली शिक्षणासाठी दररोज हुपरीत येतात.

हुपरीच्या आर्थिक प्रगतीत महत्वाचा टप्पा : श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि. हुपरीची स्थापना (1950) :

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतातही अन्नटंचाई भासू लागली. हुपरी परिसरालाही त्याची झळ बसली. १९४२ च्या काळात श्री. आबासाहेब नाईक उर्फ दादासाहेब यांनी 'महात्मा मुष्ठी फंड' नावाची धान्याची पेढी सुरू केली. गृहीणींच्या दळणातून मूठ – मूठभर धान्य गोळा करून त्यांना सभासद करून घेतले जात असे. या धान्यपेढीचा फायदा सर्वसामान्य शेतकऱ्यांनी चांगल्या प्रकारे करून घेतला. टंचाईच्या काळात ते येथून धान्य घेऊन जात आणि सुगीच्या दिवसात परत आणून देत.१९४७ मध्ये या धान्य भिशीचे रूपांतर पैशाच्या भिशीत झाले. याचे नाव 'पैसा फंड भिशी' असे ठेवण्यात आले. एक – एक पैसा जमा करायचा त्याचा एक रुपया झाला की रीतसर पावतीत समावेश करायचा अशा कल्पनेतून पैसा फंड भिशी सुरू केली. या भिशीत शेतकरी, व्यापारी, उद्योजक, कारागीर, कामगार सभासद म्हणून सहभागी झाले. दैनिक, आठवडयाची, मासिक आणि वार्षिक अशा चार प्रकारे वर्गणी गोळा केली जात होती. तीन वर्षांनंतर साठलेली रक्कम व्याजासह सभासदांना दिली हात होती. जवळपास पाचशे सदस्यांनी याचा लाभ घेतला.

कोल्हापूर संस्थानाच्या विलीनीकरणानंतर ही भिशी बंद करावी असा शेरा या विभागातल्या अधिकाऱ्यांनी दिला होता. मात्र मुंबई राज्याचे को –ऑप. सोसायटीजचे रजिस्ट्रार श्री. बी. पी. पटेल यांनी भिशीचे कामकाज पाहिले आणि भिशीचे रूपांतर बँकेत केल्यास मंजूरी देण्याचे त्यांनी आश्वासन दिले. आप्पासाहेब बळवंत नाईक, यडगोंडा देवगोंडा पाटील, गांधीवादी विचारसरणीचे कार्यकर्ते आणि जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक एल. वाय. पाटील, यशवंत रामचंद्र नाईक, बाबूराव घोरपडे, महादेव माळी, देवाप्पा नरसाप्पा भोजे, शंकर विभूते, शंकर काळे, आप्पासाहेब गाट यांच्या नेतृत्वाखाली श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक

लि. हुपरी स्थापन झाली. २४ जानेवारी १९५० ला बँकेचे रजिस्ट्रेशन होऊन २६ जानेवारीपासून बँकेच्या व्यवहारास सुरुवात झाली.

बँकेची सुरूवात झाली तेंव्हा पाचशे सभासद होते. हळूहळू ही संख्या वाढत गेली. मार्च २००० मध्ये ७३०७, मार्च २०१३ मध्ये ८७८८, मार्च २०१७ मध्ये ८९६९ इतकी सभासद संख्या होती. हुपरी बरोबरच पंचक्रोशीतील गावातही बँकेच्या पाच शाखा सुरू केल्या गेल्या. यामध्ये तळंदगे, यळगुड, पट्टणकोडोली, इंगळी, यशवंतनगर, हुपरी येथे स्थापन झाल्या. शेतकरी बांधवांना शेतीपूरक व्यवसाय तसेच चांदी व्यवसायाकरिता कर्जपुरवठा करत आहे. सोने – चांदी तारण कर्ज, चांदीमाल नजरगहाण कर्ज, स्थावर तारण कर्ज, घर बांधणी – दुरूस्ती अशा विविध कर्जांचा पुरवठा सभासदांना केला जातो. सोने आणि चांदी तारणावर ऐंशी टक्के कर्ज दिले जाते. याचा चांदी व्यवसायाच्या विकासाला फायदा झाला.

बँकेमार्फत पार पाडली जाणारी सामाजिक कार्ये –

१) मानवी जीवनाच्या जन्मापूर्वीपासून ते त्याच्या अंत्यसंस्कारापर्यंत लागणारी सर्व कार्ये करणेसाठीची मदत करायला बँकेने सुरूवात केली. निराधार व्यक्तींच्या त्याचप्रमाणे गरीब व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी बँक सहाशे रुपये अर्थसाहाय्य देते. १९६५ पासून निराधारांना अंत्यसंस्कार सहाय्य ही योजना बँक राबविते आहे.

२) १९६२ पासून सभासदांच्या एका शेअर्सच्या डिव्हिडंटमधून सामुदाईक मोफत विवाह सभारंभाचे आयोजन केले जाते. समाजातील वधू पित्यांना लग्नात होणाऱ्या खर्चाचा भार हलका करण्यासाठी त्यावेळचे कार्यकारी संचालक आ. बा. नाईक यांनी बँकेमार्फत मोफत सामुदाईक लग्न करून देण्याचे ठरविले. १९६२मध्ये क्षात्र जगद्‌गुरूंच्या उपस्थितीत अंबाबाई देवालयामध्ये हुपरीमधील नागरिकांच्या साक्षीने पहिला सामुदाईक विवाह सोहळा संपन्न झाला. लग्नाच्यावेळी वधू –वरांना आहेर, संसार उपयोगी भांडी देण्यात

येतात. याचा फायदा अनेक गरीब कुटुंबियांना झाला. आतापर्यंत सुमारे १७५०जणांचे विवाह या माध्यमातून झाले आहेत.

३) भावी पिढी सुदृढ आणि सशक्त व्हावी यासाठी गरोदर स्त्रियाकरिता मोफत शिबिराचे आयोजन करण्यात येते. १९६४ पासून हे स्त्री – रोग शिबिर सुरू आहे. १९७० पासून मोफत लसीकरणाचा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. आजही प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेला लहान बालकांना मोफत पोलिओ, ट्रिपल, बी.सी.जी. लस देण्यात येते. भारत सरकारच्या लसीकरण मोहिमेच्या अगोदरपासून बँकेचे हे कार्य सुरू आहे.

४) बालवाडी, प्राथमिक आणि माध्यमिक शैक्षणिक संस्थांना आवश्यक सुविधा उदा. पिण्याच्या पाण्याची सोय, नवीन खोल्या बांधून देणे इ. पुरविण्यावर सुद्धा भर दिला आहे. १९७५ पासून बुक बँक योजना राबविण्यात आली. १९६५पासून बँकेने आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांला उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये म्हणून दोन हजार रुपयापर्यंतचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले.

५) मिरजेच्या वॉन्लेस हॉस्पिटलच्या मदतीने १९७१ पासून वर्षातून दोन वेळेला मे आणि ऑक्टोबर महिन्यात मोफत नेत्र शिबिराचे आयोजन करण्यात येते. यामध्ये गरीब वृद्धासाठी नेत्र तपासणी आणि चष्मे मोफत देण्यात येतात. आजअखेर ३५०० रुग्णावर शस्त्रक्रिया करून त्यांना दृष्टी प्राप्त करून देण्याचे कार्य बँकेने केले आहे. गेल्या दोन वर्षापासून हृदयरोग आणि मधुमेह यांच्या मोफत तपासणीचे शिबीर माधवबाग यांच्या सहकार्याने सुरू आहे. अशा या धार्मिक आणि सामाजिक कार्यासाठी बँकेच्या वार्षिक नफ्याच्या दहा टक्के निधी बाजूला काढला जातो.

६) प्रत्येक वर्षी संस्थापक चेअरमन कै. एल. वाय. पाटील (बाबा) आणि संस्थापक कार्यकारी संचालक कै. आ. बा. नाईक (दादा) यांच्या संयुक्त पुण्यतिथी दिवशी म्हणजे २० डिसेंबर रोजी कृषि प्रदर्शनाचे आयोजन

करण्यात येते. यावेळी उत्कृष्ठ पीक स्पर्धक शेतकऱ्यांना बक्षिसे आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात येतो. गेली चाळीस वर्ष हा उपक्रम सातत्याने सुरू आहे. संस्थेने १९८१पासून गणेशोत्सव व्याख्यानमाला सुरू केली. गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्थी असे दहा दिवस येथे दररोज व्याख्यानाचे कार्यक्रम होतात. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील नामांकित व्याख्यात्यांना बोलावून सामाजिक विषयांवर व्याख्यानाचे आयोजन केले जाते. चाळीस वर्षे अव्याहतपणे याचे आयोजन सुरू आहे. शेवटच्या दिवशी खास महिलांसाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. महाराष्ट्रात ही व्याख्यानमाला प्रसिद्ध झाली आहे.

७) बँकेमार्फत हुपरी परिसरातील कोरडवाहु जमिनी बागायत व्हाव्यात या हेतूने पंचगंगा नदीचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात आणण्यासाठी बँकेने पाणी पुरवठा संस्था स्थापन केल्या. श्री महालक्ष्मी सहकारी पाणी पुरवठा संस्था आणि श्री गणेश सहकारी पाणी पुरवठा संस्था या दोन संस्थांची स्थापना करण्यात आली. हुपरी, रेंदाळ, पट्टणकोडोली, इंगळी, तळंदगे येथे पाणीपुरवठा केला जातो. केवळ एका वर्षात योजना पूर्ण करणारी त्यावेळची महाराष्ट्रातील पहिली इरिगेशन स्कीम होती. त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्याकडून याबाबत कौतुक करण्यात आले होते.

८) महिलांसाठी स्वतंत्र वनिता विभागाची स्थापना : महिला विकासासाठी बँकेने १८/५/१९७३ रोजी वनिता विभाग सुरू केला. महिलांना स्वावलंबी बनवून त्यांच्या प्रपंचाला आर्थिक हातभार लागावा म्हणून संस्थेने मोफत शिलाई शिक्षण देऊन कोर्स सुरू केला. हा कोर्स पूर्ण केलेल्या महिलांना बिनव्याजी कर्ज योजनेतून शिलाई मशीन घेण्यासाठी कर्ज उपलब्ध करून दिले. महिलांसाठी मेणापासून द्राक्षे, थर्मोकॉलपासून रथ, नारळाच्या कवटीपासून

वस्तु असे हस्तकलेचे प्रशिक्षणवर्ग आयोजित केले गेले. हुपरीच्या विकासात या बँकेचे खूप मोठे योगदान आहे.

हुपरीतील इतर महत्वाच्या सहकारी संस्था :

हुपरीमध्ये सहकार चळवळ विकसित झाली. १९५२ मध्ये दूध सहकारी सोसायटी सुरू केली गेली. यामुळे दूध उत्पादकांना चांगला नफा मिळू लागला तर गावकऱ्यांना शुद्ध दूध मिळू लागले. १९६५च्या दरम्यान येथे दररोज सुमारे २००लिटर दुधाची खरेदी विक्री केली जात होती. १९६५ मध्ये पैसाफंड बँकेच्या पुढाकाराने जनता सहकारी ऑइल मिल स्थापन झाली. तेलबिया उत्पादकांना याचे सभासद करून घेतले होते. पहिल्याच वर्षी येथे पाचशे सहासष्ट क्विंटल शेंगदाणा तेल आणि आठशे दोन क्विंटल पेंड तयार केली गेली. याचा फायदा तेल बिया उत्पादकांना चांगल्या प्रकारे झाला. एकुणच सहकार हुपरीत सुरूवातीपासूनच रुजत गेला.

ग्रामपंचायतीने केलेल्या कामापैकी एक महत्त्वाचे काम म्हणजे पाणी पुरवठयाची सोय. चांदी व्यवसायाचा विकास होत गेला तसतशी हुपरी गावाची लोकसंख्या वाढत गेली. येथील पाणीपुरवठा हा विहिरीवर अवलंबून होता. अनेक लोक येऊन येथे स्थायिक झाले. गावाची पाण्याची गरज वाढत चालली. हुपरीचे तत्कालीन सरपंच श्री. बाबूराव घोरपडे व इतर ग्रामस्थांनी कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती राजाराम महाराज यांची भेट घेतली. महाराजांनी या योजनेसाठी मंजुरी दिली आणि पंचवीस हजाराची मदत दिली. गावकऱ्यांनी छत्तीस हजार रुपये वर्गणी रूपात जमा केले. १९३९ साली भारताचे तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो आणि छत्रपती राजाराम महाराज यांच्या उपस्थितीत पाणीपुरवठा योजनेचे उद्‌घाटन करण्यात आले. हुपरीला नळाद्वारे पाणीपुरवठा होऊ लागला. राधानगरी धरणातील पाण्यावर वीज निर्मिती होऊ लागली, हुपरीलाही वीजपुरवठा होऊ लागला. पंचायतीने गावात एकशे चाळीस बल्ब आणि तीस टयूब बसविल्या. यामुळे हुपरी गाव उजळून निघाले. कोल्हापूर संस्थानात कोल्हापूर शहराशिवाय सत्तेचाळीस

ठिकाणी आठवडी बाजार भरत असे. त्यापैकी हुपरी हे एक ठिकाण होते. दर शनिवारी येथे आठवडी बाजार भरत होता. पंचक्रोशीतील लोक खरेदी – विक्रीसाठी हुपरीत येत. एकूणच स्वातंत्र्यपूर्व काळात हुपरीत उस पीक, पानमळा अशा नगदी पिकांचे उत्पादन घेतले जात होते. त्याचबरोबर हातमाग व्यवसाय काही प्रमाणात चालत होता आणि याचबरोबर चांदी व्यवसाय वेगाने विकसित होत चालला होता. यामुळे त्याकाळात हुपरी हे आर्थिक उलाढालींचे केंद्र बनले होते.

प्रकरण 3 रे

हुपरीतील चांदी व्यवसायाची सुरुवात आणि विकास

या प्रकरणात हुपरीमध्ये चांदी व्यवसायाची पायाभरणी कशी झाली, या व्यवसायाचा विकास कसा होत गेला, व्यवसायाच्या विकासासाठी पूरक ठरलेल्या संस्था – विविध योजना, चांदी व्यवसाया समोरील अडचणी याचा आढावा घेतला आहे .

हुपरीतील चांदी व्यवसायाची सुरुवात :

कोल्हापूर संस्थानाची ओळख एक प्रागतिक संस्थान म्हणून आहे. विशेषत: राजर्षी शाहूराजांचा कालखंड हा सर्वच क्षेत्रांच्या प्रगतीचा कालखंड ठरला. राजांनी अनेक क्षेत्रांच्या विकासाला चालना दिली त्यापैकी एक क्षेत्र होते सुवर्ण आणि रौप्य व्यवसायाचे क्षेत्र ! कोल्हापूर शहरात या व्यवसायाचा विकास झाला. त्याचबरोबर संस्थानात इतर ठिकाणीही झाला. त्यापैकीच एक गाव होते हुपरी. कोल्हापूरपासून पंचवीस किलोमीटरवर असलेले हे गाव वाहतूक सोयीच्या अभावामुळे सुरूवातीच्या टप्यात आधुनिकीकरणाचे वारे तेवढे न पोहोचल्यामुळे तुलनेने थोडे मागासलेले होते.

शेती हा या गावचा पारंपारिक व्यवसाय होता. गावाजवळ नदी नसल्यामुळे प्रामुख्याने पावसावरच अवलंबून राहावे लागत होते. शिवाय १८८० च्या आसपास या परिसरात पन्नास हातमाग चालत होते. शेतीबरोबरच कापड विणण्याचा व्यवसाय विकसित झाला होता मात्र काळाच्या ओघात तो कमी होत गेला. १८८१ मध्ये गावाची लोकसंख्या ३३३५ इतकी होती. विसाव्या शतकाची सुरुवात मात्र या गावासाठी खूप महत्त्वाची ठरली. याच काळात येथे चांदी व्यवसायाचा पाया घातला गेला आणि बघता–बघता सगळे गावच या व्यवसायात गुंतले गेले आणि हुपरीचे रूपच पालटून गेले.

हुपरीत काही सोनार काम करणारी कुटूंबे राहत होती. येथील सरकारी चावडीत वसुलीसाठी सोनार लोक होते.या परिसरातील लोकांना हे दागिने बनवून देत. यापैकी श्री. कृष्णाजी रामचंद्र पोतदार (सोनार) यांनी १९०४ मध्ये हुपरीत प्रथम चांदी कामाचे दुकान सुरु केले आणि येथे चांदी व्यवसायाचा पाया घातला गेला. हुपरी परिसरातील सोनार सुरूवातीला कोल्हापूरच्या छत्रपतींच्या लवाजम्यातील हत्ती, घोडयांना सजविण्यासाठी लागणारे गोंडे, कोयऱ्या अशा प्रकारचे दागिनेही तयार करत असत. यासाठी त्यांना कोल्हापूर संस्थानाकडून भरपूर प्रोत्साहन मिळाले होते. संस्थांनाकडून असणारी मागणी वाढत गेली.यामुळे चांदी व्यवसाय येथे लगेच रुजला. चांदी व्यवसायाच्या रुपाने कलेचे एक नवे क्षेत्र येथील कलाकारांना उपलब्ध झाले. श्री. कृष्णाजी पोतदार यांनी आपल्या मुलांबरोबरच गावातील इतर तरुणांना ही कला शिकविली. नंतरच्या काळात या तरुणांनी हा व्यवसाय करायला सुरवात केली व चांदी व्यवसाय वाढत गेला.

चांदी व्यवसायाचा विकास:

श्री. कृष्णाची पोतदार यांनी जेव्हा हे काम सुरू केले तेव्हा यंत्राचा वापर होत नव्हता, किंबहुना अशी यंत्रे या भागात नव्हती. दागिने निर्मितीच्या सर्व प्रक्रिया हातानेच करायला लागत. विविध प्रकारचे साचे त्यांनी स्वत: तयार केले होते. त्यांनी हाताने बनवलेले दागिने अत्यंत सुबक, सुंदर होते आणि ते अल्पावधीत लोकप्रिय बनले. त्यामुळे दागिन्यांची मागणी वाढली. १९१४ मध्ये त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा वारसा त्यांची मुले वामनराव व आनंदराव यांनी पुढे चालविला. गावातील इतर काही तरुणही या कलेत पारंगत झाले होते. चांदी कारखान्याची संख्याही वाढत गेली. विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर हा व्यवसाय अधिक तेजीत आला. हुपरीतील चांदी व्यवसायिकांची संख्या वाढत गेली. १९२२ मध्ये सुमारे पंचवीस चांदी कारखाने होते. १९४० नंतर ही संख्या शंभरवर गेली. तर १९४५ मध्ये सुमारे सव्वाशे चांदी कारखाने आणि त्यातून काम करणारे एक हजार पेक्षा

अधिक कारागीर असे चित्र होते. महिन्याला साधारणपणे दोन लाख रुपयांची उलाढाल येथे होत असे.

यंत्राचा वापर–

सुरूवातीच्या काळात कच्चा मालापासून सुबक अलंकारापर्यंतच्या निर्मितीच्या सर्व प्रक्रिया हातानेच कराव्या लागत. जे अत्यंत कष्टाचे काम होते. येथे कमरपट्टा, घागरी, पोकळ वाळे, वाक्या, गोंडे इ. दागिने तयार केले जाऊ लागले. या मालाची सुबकता पाहून कोल्हापूर, सांगली, मिरज या भागातले व्यापारी–सराफ भांडवल पूरवून येथून माल तयार करुन घेऊ लागले.

यंत्राचा वापर करून दागिने तयार करण्याचा प्रयोग प्रथम वामनरावांनी केला. शिवाय डायपंच ही त्यांनी स्वत: तयार केले होते. त्यांनी तयार केलेल्या कोयली, तोरडी, कडदोरा, घागरी, पैंजण, चाळ, कांदे फुली, कमरपट्टे, घागरपट्टा, पोकळ वाळे या दागिन्यांना कोल्हापूर बरोबरच सांगली, मिरज, शहापूर, सोलापूर, पुणे, मुंबई या ठिकाणांच्या पेठांमध्ये मागणी होती. वामनरावांनी नंतर आणखी काही मशीन आणली. त्यामुळे मालाची सुबकता वाढून मागणी आणखीन वाढली. या व्यवसायाची पाळेमुळे खूप घट्ट रोवली गेली. पोतदार कुटुंबाबरोबरच बालाजी कस्तुरे, मारुती पलसे, केशव रणदिवे, बाळा जोगती, भाऊ जोगती, भाऊसाहेब गाठ इत्यादी तरुण या व्यवसायात उतरले. व्यवसायाचे स्वरूप विस्तारत गेले. कुठल्याही जाती धर्माचे बंधन त्यासाठी उरले नाही. वामनराव पोतदारांनी अत्यंत धोरणीपणाने या व्यवसायाचा विस्तार घडवून आणला. त्यांच्या चांदी कारखान्यात जवळजवळ चाळीस कारागीर काम करत होते. सरासरी पंचवीस ते तीस रुपये दरमहा पगार त्यांना दिला जात असे. शिवाय प्रत्येक कामगाराला दरवर्षी एक तोळा सोनेही ते देत असत.

१९१४ मध्ये श्री. वामन कृष्णाजी पोतदार यांनी प्रथम येथे इंटरनॅशनल पास्टा मशिन व प्रेस मशिन आणले आणि येथून पुढे चांदी व्यवसायात यंत्राचा वापर होऊ लागला. या यंत्राचा वापर चांदीची तार काढण्यासाठी व पत्रे तयार

करण्यासाठी केला जात होता. मात्र याकाळात वीजेची सोय नसल्यामुळे हे मशिन हातानेच चालवले जात असे. अधिक नाजूक दागिने बनविणे आणि दागिन्यांची वाढती मागणी पूर्ण करणे या यंत्रामुळे शक्य झाले. हुपरीत तयार होणाऱ्या दागिन्यांची पहिली बाजारपेठ कोल्हापूर ही होती नंतर इतर जिल्हयातूनही मागणी वाढत गेली आणि व्यवसाय करणाऱ्यांचीही संख्या वाढत गेली. चांदी व्यवसायामुळे अनेक कुटुंबे परगावातून आणि परराज्यातून हुपरीत येऊन स्थायिक झाली. काहींनी सुरूवातीला कारखान्यात कामगार म्हणून काम करायला सुरूवात केली. अनेकांना या व्यवसायाने रोजगार उपलब्ध करुन दिला. हुपरीतील जवळ जवळ ऐंशी टक्के लोक हे या व्यवसायात गुंतले. दागिन्यांची मागणी दिवसेंदिवस वाढत गेल्यानं १९६५ पर्यंत येथे चांदीच्या कारखान्यांची संख्या तीनशे इतकी झाली. हा व्यवसाय हुपरी बरोबरच जवळपासच्या गावातही पसरला. इ.स. २०१० पर्यंत या परिसरात तीन हजार चांदी कारखानदार तर जवळपास चाळीस हजार लोक या व्यवसायाशी संबंधित विविध कार्य करत होते.

१९५७ मध्ये शांताप्पाण्णा इंग्रोळे यांनी चांदीचा टंच (शुद्धता) काढण्याची पहिली रिफायनरी सुरू केली. याकामी त्यांना रयत शिक्षण संस्थेच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. टी. इ. बगाडे यांनी मार्गदर्शन केले. हा चांदी व्यवसायाच्या वाटचालीतील महत्वाचा टप्पा ठरला. पूर्णपणे हाताने केली जाणारी टंच काढण्याची ही प्रक्रिया चार ते पाच तास चालायची, नंतरच्या काळात ही प्रक्रिया मशीनच्या सहाय्याने होऊ लागली.

हुपरीच्या चांदी उद्योगांने आसपासच्या पंचक्रोशीमध्ये आपले हातपाय पसरले आहेत. हुपरीच्या साधारणपणे दहा ते पंधरा किलोमीटर परिसरातील गावांमध्ये हा चांदी व्यवसाय पोहोचला आहे. यामध्ये मांगुर, यळगुड, रेंदाळ, तळंदगे, पट्टणकोडोली, इंगळी, रांगोळी, बारवाड, कारदगा, रणदिवेवाडी अशा जवळपास दहा ते बारा गावांमध्ये चांदी व्यवसायाची पाळेमुळे पोहोचली आहेत. आज या गावातून इतर अनेक व्यवसाय चालत असले तरी एकेकाळी हुपरीतील

चांदी व्यवसाय हेच या गावांच्या रोजगाराचे मुख्य साधन होते. इथले कारागीर सुरुवातीस आपल्या गावापासून हुपरीत येऊन काम करत असत. कालांतराने व्यापाऱ्यांचा तसेच कारखानदारांचा विश्वास बसल्यावर थेट स्वत:च्या गावात चांदी घेऊन जाऊ लागला आणि स्वत:च्या घरी दागिन्यांचे उत्पादन करू लागला. आजही हुपरीतील काही धडी उत्पादक या गावातील पुरुष त्याचप्रमाणे स्त्री कारागिरांच्या मदतीने आपले काम करत आहेत. यातीलच काही गावांचा घेतलेला हा आढावा.

१) पट्टणकोडोली – पट्टणकोडोली, हुपरीपासून आठ किलोमीटरवर असणारे गाव. १९५०पासून इथले कारागीर हुपरीत जाऊन काम करत असत. साधारणपणे १९७० च्या दशकात येथील ३५ कारागिरांनी एकत्र येऊन सूत पास्ता मशीन आणले. याला कंपनी सुरू करणे असे म्हणत. हुपरीतील व्यापाऱ्यांचा या लोकांवरचा जसा विश्वास वाढत गेला तसे पट्टणकोडोलीतील कामांची संख्या देखील वाढत गेली. यामध्ये आटणीपासून ते दागिने पॉलिश करण्याच्या सुविधापर्यंत अशा सर्व सेवा इथं सुरू झाल्या.

२) मांगुर– हुपरीपासून अवघ्या पाच किलोमीटरवर कर्नाटकाच्या हद्दीत असलेले हे गाव. मांगुर गावाचे वैशिष्टय म्हणजे साखळी तयार करणे. मांगुरची हातसाखळी ही देशभरात प्रसिद्ध होती. पैंजणात सर्वात महत्त्वाचा घटक तो म्हणजे साखळी. या साखळीवरच पुढील डिझाइनचे काम किंवा जोडकाम चालत असे. १९५० च्या आसपास हुपरीतून सूत काढून आणायचं आणि साखळी करायची अशी पद्धत होती. हळूहळू मांगुरला देखील सूत तयार करण्याचं काम सुरू झालं. एका दिवसाला एक कारागीर साधारणपणे ३०० ग्रॅम साखळी तयार करतो. आज या पाच हजार वस्तीच्या गावानं चांदी उद्योगात एक स्वतंत्र स्थान मिळवले आहे

३) रेंदाळ – हुपरीपासून सुमारे तीन किलोमीटरवर असलेल्या आणि हातमागासाठी प्रसिद्ध असलेल्या या गावात चांदी व्यवसायाचा विकास

झाला. अनेक धडी उत्पादक या गावात कार्यरत आहेत. येथील स्त्रियांचाही या व्यवसायात मोठा सहभाग आहे.

४) तळंदगे – हुपरीच्या दोन ते तीन किलोमीटर परिसरात आणखीन अनेक छोटी मोठी गाव आहेत तिथं चांदी व्यवसाय विकसित झाला. त्यातल एक गाव म्हणजे तळंदगे. १९९० च्या दशकात या गावातील बहुतांश कारागीर हे हुपरीत कामाला जात होते. हळूहळू हुपरीतील व्यापाऱ्यांकडून काम आणून चांदी माल तयार करणारे उत्पादक येथे तयार होत गेले. येथे शेतीबरोबरच हा पूरक व्यवसाय झाला आहे.

दागिने तयार करण्याच्या प्रक्रिया –

चांदीचे हस्तकला दागिने बनविण्यास मोठी हत्यारे अगर यंत्रसामुग्री लागत नाही. चांदी व्यवसाय सुरू करताना अल्प भांडवलावर परंतु सचोटीने हा उद्योग सुरू करता येतो. उद्योजकाचा प्रामाणिकपणा, पत आणि कष्टाच्या तयारी यावरच धडी करणेस त्याला मोठया चांदी कारखानदाराकडून चांदी मिळते. पक्कड, सवाणा, तडी, खोका, विटा आणि स्टोव्ह या मोजक्या साधनांसह व्यवसाय सुरू करता येतो. मालक आणि नोकर असा भेदभाव न मानता सर्वजण एकजुटीने काम करत असतात. त्यामुळेच आजचा कारागीर हा उद्याचा उद्योजक असतो. चांदीची आटणी काढणे, चांदीचा टंच काढणे, मशीन प्रेस, सूत पास्टा बनविणे, बुलियन, साखळी जोडकाम करणे, हस्तकला दागिने बनविणे, पॉलिश करणारे, तासकाम आणि मीनाकाम करणे अशी विविध कामे या व्यवसायात केली जातात.

कच्च्या चांदीपासून एखादा दागिना करताना दागिन्यांच्या प्रकारानुसार जवळजवळ विविध प्रकारच्या वीस ते तीस प्रक्रिया कराव्या लागतात. ३५ ते ७० टंचापर्यंतच्या चांदीपासून वेगवेगळे दागिने तयार केले जातात. दागिन्यांसाठी आणि इतर वस्तूंसाठी वापरलेल्या चांदीमध्ये काही प्रमाणात तांबे आणि जस्त यांचे मिश्रण असते. उच्च तापमानाला टिकू शकणाऱ्या विटांच्या बांधीव भट्टीत एका पात्रात चांदी ठेवून कोळसा पेटवून चांदी वितळवली जाते. त्यानंतर ती बिडाच्या

साच्यात ओतून आपल्याला पाहिजे त्या मापाच्या लगडी किंवा पट्या तयार केल्या जातात. या कामाला आटणी असे म्हणतात. या आटणी कामात काढलेल्या पट्या विशिष्ट अशा मोजमापाच्या रुळाच्या मशीनमध्ये घालून त्याच्या तारा अथवा पातळ पट्या बनविल्या जातात. याला पास्टा असे म्हणतात. या पट्या शेणी (गोवऱ्या) मध्ये तापवून नरम केल्या जातात. त्यानंतर दाब प्रेस मशीनवर डिझाईनच्या साच्यामध्ये पट्या घालून त्यावर डिझाईन तयार केले जाते. जर तारा तयार केल्या असतील तर त्या तारांना मोजमापानुसार बारीक केले जाते, त्याला सूत असे म्हणतात. हे सूत सुद्धा शेणी (गोवऱ्या) मध्ये तापवून कामासाठी घेतलं जाते. यातून डिझाईन जोडणारे फासे, पैंजण जोडणारे आकडे, वाळे इ. तयार केले जाते.

हुपरीची खासियत आहे ती पैंजण निर्मितीची. हुपरीतील सुतार आणि लोहार पैंजण नक्षीसाठीचे लोखंडाचे डाय (साचे) तयार करून देतात. पैजण तयार करताना दाब प्रेस मशीनमधून तयार झालेले डिझाईन आणि सूत मशीनमधून तयार होणाऱ्या कड्या आणि फासे एकत्र जोडून जी चेन तयार केली जाते त्याला भरणी असे म्हणतात. डिझाईन आणि फासे सलफ्यूरिक ॲसिड मध्ये स्वच्छ करून ते एकसंघ भरण्यासाठी दिले जातात. अशा या भरणीचं काम स्त्रिया करतात. भरणीमध्ये डिझाईनचे वेगवेगळे डाक ठेवून खार (नवसागर) ठेवून ते चिटकवतात. त्यानंतर ठराविक उष्णतेवर गरम केल्यामुळे हा डाक चिकटला जातो याला वरावणे असे म्हणतात.

योग्य त्या मापामध्ये आणि ऑर्डरीप्रमाणे कुशल कारागीर पैंजण निर्मितीच काम करतात, तयार झालेले पैंजण ॲसिड व पाण्याच्या मिश्रणामध्ये पॉलिश केले जाते. यालाच उकाडा असे म्हणतात. यानंतर गरजेनुसार मीना भरण्यासाठी पैंजण दिले जाते. त्यानंतर व्हायब्रेटर मशीनमध्ये या दागिन्यांना चांदीचा मुलामा दिला जातो. साधारणपणे एक किलो चांदीच्या मुलामासाठी सहा ग्रॅम शुद्ध चांदीचा वापर केला जातो. आकर्षणासाठी गरजेप्रमाणे दागिन्यांवर तासकाम केले जाते. पुढे पॅकिंग

करून विक्रीसाठी दिले जाते. अशाप्रकारे गरजेप्रमाणे जवळपास तीस वेगवेगळ्या प्रक्रिया आणि हाताळणी केल्यानंतर चांदीचे सुबक पैंजण तयार होते.

चांदी उत्पादकांकडून वजन करून चांदीचा माल स्त्री कारागीरांना वरावणे भरण्यासाठी, माट्या भरण्यासाठी किंवा इतर कामासाठी दिला जातो. काम पूर्ण झाले की तयार माल संबंधित स्त्रियांकडून उत्पादकाला परत केला जातो. हा सगळा व्यवहार परस्पर विश्वासावर चालतो.

हा हस्तकला व्यवसाय हुपरी आणि आसपासच्या खेडयापाडयात घरोघरी असल्याने वेगळ्या प्रशिक्षणाची गरज भासत नाही. पुरुष आणि स्त्रिया कारागीर एकमेकांचे काम पाहून हे काम शिकतात. कामाची मजुरी ही होणाऱ्या कामाच्या प्रमाणात निश्चित ठरविले असल्यामुळे रोज किती रुपये मिळणार हे प्रत्येकाला सहज कळते.

चांदीच्या दागिन्यातील विविधता व वैशिष्टये :

आज हुपरीत विविध प्रकारचे दागिने बनविले जातात. आधुनिक फॅशनच्या विविध हेअरपिन्स,कानातले, गळयातले, कमरपट्टा, हातातल्या बांगडया, अंगठया, ब्रेसलेट इ. आपादमस्तक दागिन्यांना मागणीही आहे. विशेषत: येथे बनविल्या जाणाऱ्या पैंजण/पायलला खूपच मागणी आहे. येथील कलाकारांनी स्वअनुभवातून याचे २०० ते २५० डिझाईन विकसित केले आहे. मागणीप्रमाणे त्यात नवे—नवे बदलही केले जातात. म्हणजेच हे बदल पटकन करण्याची क्षमता येथे आहे. शिवाय दागिन्याचे जोडकाम काही कारणांमुळे तुटले तर ते दुरुस्त करता येते. दागिना बदलण्याची गरज नसते. हुपरी येथे तयार होणारे दागिने मद्रास, हुबळी, म्हैसूर, पुणे, मुंबई, सोलापूर,हैदराबाद, नागपुर, अहमदाबाद या सारख्या शहरांबरोबरच भारतभर पोहोचू लागले आहेत. आज हुपरीत २१ आणि २२ गेजचे दागिने १५ ग्रॅम इतक्या कमी वजनात तयार होतात. त्यामुळे हुपरीतील चांदी दागिन्यांना वाढती मागणी आहे. आज हुपरीत शुद्ध चांदी दागिन्यांबरोबरच ॲटीक्स (ऑक्सिडाईज्ड) दागिनेसुद्धा तयार केले जातात. या दागिन्यांना परदेशी

बाजारपेठ उपलब्ध होत आहे. आज वेगवेगळ्या फॅशनप्रमाणे दागिन्यांची मागणी वाढू लागल्याने हुपरीतील उद्योजक काळाची पाऊले ओळखत व्यवसायात बदल घडवत आहेत.

दागिन्याशिवाय केल्या जाणाऱ्या इतर वस्तु :

आजदेखील हुपरीच्या चांदी व्यवसायाच्या उलाढालीत जवळपास ऐंशी टक्के वाटा हा पैंजणाचा आहे. याबरोबरच इतर वस्तूही केल्या जात आहेत. अलीकडच्या कालखंडात देवळात आणि घरातल्या देवपूजेसाठी लागणाऱ्या वस्तु चांदीच्या करून घेण्याची पद्धत जास्त लोकप्रिय होत आहे. हुपरीतल्या काही उद्योजकांनी हे आव्हान पेलून अशा प्रकारच्या वस्तू तयार केलेल्या आहेत. यामध्ये घरातल्या कळशी, देवघरातील देवतांच्या मूर्ती, दिवे, पळी पंचपात्र, करंडे, घंटी इ. बरोबरच मोठया देवळातील देवाचे अलंकार, प्रभावळ, चौकटी, पादुका, मुखवटे, मुकुट, पालखीला लावले जाणारे सिंहमुख अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे. हुपरीतील चांदी उद्योजक सतीश भोजे यांच्या मते अशा वस्तूंना भारतभरातून मागणी वाढत आहे. हुपरीतल्या कारागीरांनी अतिशय सुंदर नक्षीकाम असलेल्या वस्तु तयार केल्या आहेत.

ऑक्सिडाईज्ड दागिने (ॲन्टिक ज्वेलरी) :

नव्या पिढीकडून मागणी असणारी ज्वेलरी म्हणून ॲन्टिक ज्वेलरीचा उल्लेख करावा लागतो. विशिष्ट प्रक्रिया करून काळसर झाक असणारे हे दागिने तयार केले जातात. याचे जोडकाम किंवा भरणी अशा प्रक्रिया स्त्रियाकडून पार पाडल्या जातात. परदेशात राहणाऱ्या भारतीय स्त्रियांकडूनही या ज्वेलरीला खूप मागणी आहे.

चांदी व्यवसायाचा विकास :

हुपरीतील चांदी व्यवसायाच्या विकासास अनेक गोष्टी पूरक ठरल्या. १९२६ मध्ये कोल्हापूर–हुपरी अशी मोटारगाडी सुरु झाली. यामुळे व्यापारासाठी परगावी जाणे येणे अधिक सोपे झाले. जेंव्हा वाहतुकीसाठी गाडया नव्हत्या त्यावेळी तयार

झालेला चांदीचा माल बैलगाडीतून कोल्हापूर रेल्वे स्टेशनवर नेऊन तेथून परपेठेवर पाठवला जात असे. दुसऱ्या पेठांवर माल पाठवण्यासाठी पोस्टाचा सुद्धा वापर केला जात असे.

१९४४ मध्ये हुपरीमधील उद्योजकांनी एकत्र येऊन चांदी कारखानदार (उद्योजक) असोसिएशन स्थापन केले. यामुळे व्यावसायिकांच्या व कामगारांच्या समस्या सोडविणे शक्य झाले. १९४८ साली असोसिएशनने सहकारी पद्धतीवर भांडवल उभारून माल वाहतुकीसाठी स्वतच्या मालकीच्या चार गाडया घेतल्या. हुपरीतून तयार झालेला माल कोल्हापूरच्या रेल्वे स्टेशनवर आणला जायचा. तेथून तो देशातील दिल्ली, लखनौ, कानपुर, कलकत्ता, अमृतसर इ. ठिकाणी पाठवला जात होता. नंतरच्या काळात काही व्यापारी बेळगाव विमानतळावरून परपेठेत मालाचे पार्सल पाठवत होते. परपेठावरचे काही व्यापारी हुपरीत आठवडा ते दोन आठवडे थांबुन माल तयार करून घेऊन जात असत.

१९५३ पर्यंत असोसिएशनची वाहतूक व्यवस्था सुरू राहिली. या वर्षीपासून एस.टी. महामंडळाची वाहतूक व्यवस्था हुपरीत सुरू झाली. हुपरीचा शहरी भागाशी संपर्क आणखीन वाढला. चांदी व्यवसायाच्या विकासासाठी ही गोष्ट पूरक ठरली. व्यवसायाशी संबधित विविध व्यवहारांसाठीचे नियम तयार केले गेले. गावात श्री पैसाफंड शेतकी सहकारी बॅंकेची स्थापना करण्यात आली याचा फायदा चांदी कारखानदार, कामगारवर्ग आणि शेतकरी या तिन्ही वर्गांना झाला. १९५६ मध्ये हुपरीत वीज आली आणि विद्युतशक्तीचा वापर यंत्रे चालविण्यासाठी होऊ लागला. १९६२ मध्ये टेलिफोनची सुविधा झाल्याने विविध प्रकारचे व्यवहार, तसेच बाहेरील व्यापाऱ्यांशी संपर्क करणे अधिक सोईचे झाले. १९७२ मध्ये भारत सरकारच्या हस्तकला बोर्डाने चांदी हस्तकला कौशल्याच्या वाढीसाठी कोल्हापूर शहरात स्वतंत्र कार्यालय सुरु केले. याचा फायदा हुपरीच्या या चांदी हस्तकला उद्योगाच्या वाढीस झाला. हुपरीचे दागिने राष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचले.

व्यवसायाच्या प्रगतीसाठी आवश्यक सुविधा :

औद्योगिक विकासासाठी चांगले रस्ते, रेल्वे, विमानतळ म्हणजेच दळणवळण व्यवस्था, पाणी, वीज इत्यादी गोष्टी आवश्यक मानल्या जातात. सेझ निर्माण करताना सरकारने याची काळजी घेतलेली दिसते. पण हुपरीची परिस्थिती बघितली की यातल्या बऱ्याच सुविधा नसतानाही हुपरीकरांनी चांदी व्यवसायाचा विकास घडवून आणला. प्रतिकूल परिस्थितीवर जिद्दीने मात करत किंवा सरकारकडून कोणत्याही विशेष सुविधा नसताना वाटचाल केली यामुळे हुपरीचे वर्णन स्वयं विकसित विशेष आर्थिक क्षेत्र (Self Developed Economic Zone) असे केले जाते. शेअर बाजारातील चांदीच्या दराचा चढ–उताराचा, आर्थिक मंदीचा फटका येथील व्यवसायिकांना अनेक वेळा बसला आहे. पण या आर्थिक संकटातूनही हा व्यवसाय तरला आहे. मात्र व्यवसाय भरभराटीला नेण्यासारखी परिस्थिती निश्चितच उरलेली नाही. ती जर न्यायची असेल तर सरकार मार्फत चांदी दागिने उत्पादकांना विशेष सवलती, सुरक्षितता देणे, स्त्रियांच्या कौशल्याचा वापर करणे आवश्यक आहे.

चांदी व्यवसायाच्या प्रगतीसाठी स्थापन झालेल्या कंपन्या :

चांदी व्यवसायाच्या विकासासाठी हुपरीतील काही मंडळींनी पुढाकार घेऊन कंपन्या स्थापन केल्या. त्यांच्यामार्फत व्यवसायिकांची विविध कामे करून दिली जाऊ लागली. यापैकी काही कंपन्या पुढीलप्रमाणे

1) अशोक कंपनी (1939):

पास्टा काढणे, तारा ओढणे, चांदी आटणी अशी कामे चांदी व्यावसायीकाला सहजरीत्या उपलब्ध व्हावीत आणि त्याला रास्त दरात संबंधित कामे करून मिळावीत या हेतूने आनंदराव दिवाळे यांनी अशोक कंपनीची १९३९ मध्ये स्थापना केली. दोन हजार रुपयाचे प्राथमिक भांडवल उभा करून त्यांनी सुभाष टॉकीज जवळ कामास सुरुवात केली. येथे लहान कारखानदारांची कामे

मजुरीवर करून दिली जात होती. पंधरा कुशल कारागीर येथे काम करत होते. कंपनीच्या कामाचा व्याप वाढल्यानंतर त्यांनी गरजेप्रमाणे यंत्रसामुग्रीत वाढ केली.

2) सन्मित्र कंपनी (1942):

चांदी कारखानदारीच्या विकासासाठी स्थापन झालेली ही हुपरीतील सर्वात जुनी संस्था. चांदी उद्योगात यांत्रिकीकरणासाठी कृष्णाजी पाटील, विठ्लराव देसाई यांनी १९४२ मध्ये सन्मित्र कंपनीची स्थापना केली. कामाचा वेग वाढविण्यासाठी त्यांनी सूत आणि पास्टा यांच्या चार मशीन आणल्या. केवळ आठ कारागीरांवर काम सुरू केलेल्या कंपनीत १९६६ मध्ये अठरा कारागीर होते.

3) श्री सुदर्शन कंपनी – चांदी कारखाना (1944) :

चांदी उद्योग वाढीच्या काळात श्रम आणि पैसा वाचविण्यासाठी यांत्रिकीकरणाची गरज होती. हुपरीचे जेष्ठ नेते यडगोंडा पाटील आणि त्यावेळचे सरपंच बाबुराव घोरपडे यांनी हुपरी रेंदाळ रस्त्यावर श्री सुदर्शन कंपनीची स्थापना १९४४ मध्ये केली. सुरुवातीस शहात्तर सभासदांनी एकशे पंचवीस रूपयांचा एक शेअर याप्रमाणे भांडवल गोळा केले. सूत आणि पास्टाचे काम करणारी ही त्यावेळची मोठी कंपनी होती. विविध प्रकारची वीस हजार रुपयांची आठ यंत्रे येथे होती. कंपनीत बावीस कुशल आणि अनुभवी कारागीर काम करत होते.

4) श्री बसवेश्वर कंपनी (1957):

चांदी माल उत्पादकांची आणि बिगर सभासदांची सूत ओढणी आणि पास्टा काढणे अशा कामांची रास्त दरात गरज भागावी आणि अशी कामे यांत्रिक पद्धतीने सामुदाईक प्रयत्नावर करण्याच्या दृष्टीने विठ्लराव होगाडे, आप्पासाहेब भोसले, कृष्णाप्पा कुंभार इ. मंडळींनी पुढाकार घेवून श्री बसवेश्वर कंपनीची १९५७ मध्ये स्थापना केली. सुरुवातीला कंपनीचे कामकाज हुपरीतील चावडीजवळ जमादार यांच्या इमारतीत चालत होते. कंपनीने चांगल्या प्रतीची चार यंत्रे बसविली. यामध्ये बारा कुशल कारागीर काम करत होते. १९६६ मध्ये दर महिन्याला दीड ते दोन हजार रुपये किमतीचे येथे काम केले जात होते.

कालांतराने अशा प्रकारची कामे काही व्यावसायिक खाजगी पातळीवर कमी वेळात करून देऊ लागले. यामुळे यातील काही कंपन्या कालांतराने बंद झाल्या.

चांदी व्यवसायाच्या प्रगतीसाठी कार्यरत संस्था आणि आखलेल्या विविध योजना :

चांदी व्यवसायाच्या विकासासाठी हुपरीत स्वातंत्र्यपूर्व काळापासून सहकारी संस्था स्थापन झाल्या त्या आजही कार्यरत आहेत.

1) चांदी कारखानदार (उद्योजक) असोसिएशन, हुपरी (स्थापना 1943)

१९३०च्या मंदीच्या काळानंतर चांदी हस्तकला उद्योगास तेजीचा काळ लाभला. ग्राहकांच्या आवडीनुसार आणि मागणीनुसार ब्रेसलेट, नेकलेस, पैंजण अशा प्रकारचे चारशे ते पाचशे नमून्यांचे दागिने तयार होऊ लागले. मीनाकाम, तासकाम यामुळे दागिन्यात सुबकता आणि आकर्षपणा आला. व्यवसाय वाढत गेला त्याचप्रमाणे काही समस्याही निर्माण होऊ लागल्या. व्यावसायिक, कारागीर, व्यापारी इ. घटकात वाद निर्माण होऊ लागले. यावर तोडगा काढण्यासाठी दुसऱ्या महायुद्धानंतर १९४४ मध्ये साधारणपणे साठ ते सत्तर चांदी व्यवसायातील कारागीर एकत्र येऊन त्यांनी चांदी कारखानदार (उद्योजक) असोसिएशन, हुपरी या संस्थेची स्थापना केली. संस्थेने सभासदांकरिता अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामध्ये सभासद ओळखपत्र, कामगार हजेरी बुक, धडी रुजवात पत्र, फिरती व्यावसाईक सभासद पहचान फाईल, लघुउद्योग नोंदणी सुविधा आहेत.

१) हस्तकलेच्या या व्यवसायात आधुनिकता आणण्यासाठी असोसिएशनमार्फत प्रयत्न केले जातात.

२) उद्योजक आणि कारागीर यांच्यामध्ये समन्वय साधला जातो. चांदी हस्तकला दागिने बनविण्याच्या मजुरी आणि वेस्टेज दरात वेळोवेळी दरवाढ करणेस मंजूरी देण्यात येते.

३) रवाना शिफारस पत्र (व्हौचर) – संस्थेचे सभासद चांदी व्यवसायानिमित्य परपेठेवर प्रवासास जात असताना त्यांना कोणतीही अडचण येऊ नये, पोलिस चौकशी व इतर चौकशीवेळी त्यांना सहाय्य व्हावे या उद्देशाने सभासदांना संस्थेकडून रवाना शिफारसपत्र देणेची सोय उपलब्ध केली आहे.

४) पहचान फाईल – चांदी कारखानदार (उद्योजक) असोसिएशन, हुपरी या संस्थेचा सभासद आणि व्यापारी असलेली ही पहचान फाईल असते. सभासदांना व्यापारासाठी राज्यात आणि परराज्यात जाताना या पहचान फाईलचा उपयोग होतो.

५) सभासदांना कायदेविषयक माहिती देणेसाठी कायदे सल्लागार – शासनाचे धोरण बदलत असते. नवनवीन कायदे केले जातात. याची सभासदांना माहिती व्हावी या उद्देशाने संस्थेने कायदे सल्लागाराची नेमणूक केली आहे

६) दक्षता कमिटी – संस्थेचे सभासद परपेठेवर फिरतीसाठी जात असताना पोलिस अधिकारी अडवून त्रास देतात. त्यांना कायद्याची भीती घातली जाते प्रसंगी चांदीचे दागिने जप्त केले जातात. कोणत्या गुन्ह्याखाली जप्ती केली याबाबत योग्य माहिती दिली जात नाही. सभासदांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये. चांदी हस्तकला व्यवसाय निर्भयपणे करता यावा यासाठी दक्षता कमिटीची नियुक्ती करण्यात आली आहे.

७) भारत सरकारच्या विविध योजनांचा सभासदांना लाभ–हस्तकला बोर्ड यांच्या सहकार्याने संस्थेच्या वतीने सभासदांसाठी शासनाची राजीव गांधी शिल्पी स्वास्थ विमा योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत लाभार्थीस ठराविक हप्त्यामध्ये ठराविक रक्कमेपर्यंतचा दवाखान्याचा खर्च मिळतो.

संस्थेच्या वतीने चांदी हस्तकला उद्योजक, सभासद आणि पहचान फाईल धारकांसाठी भारत सरकारच्या वस्त्रमंत्रालय (हस्तकला) यांच्या

विभागीय कार्यालय कोल्हापूर यांचे मार्फत मोफत हस्तकारागीर ओळखपत्र आणि त्यांच्यासाठी आम आदमी विमा योजना राबविण्यात येत आहे.

८) विविध प्रशिक्षण वर्गाचे आयोजन – हस्तकला बोर्ड, कोल्हापूर जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर तसेच जेम्स अँड ज्वेलरी, मुंबई अशा घटकांच्या सहकार्याने संस्थेमार्फत चांदी हस्तकला उद्योगास साहाय्य होणारे विविध प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये स्त्री – पुरुष उद्योजकांना प्रशिक्षण देऊन त्यांना प्रशिक्षित केले जाते. २०१०मध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे मार्फत पंधरा दिवसांचा ज्वेलरी डिझाईन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

९) चांदी उद्योजक महिलांना सभासदत्व – हुपरी आणि परिसरातील गावामध्ये पुरुषांच्या बरोबरीने महिलाही चांदी हस्तकला दागिने बनविण्याच्या उद्योगात कार्यरत आहेत. त्यांना व्यवसाय करणे सुलभ व्हावे आणि कोणतीही अडचण येऊ नये म्हणून संस्थेने महिलांना सभासद करून घेतले आहे. या निर्णयाची अंमलबजावणी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०१४ पासून सुरू केली आहे.

१०) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेबरोबर सहकार्य करार – सिल्वर ऑरनामेंट क्लस्टर या योजनेअंतर्गत संस्थेने १०जानेवारी २०१४ रोजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेबरोबर सहकार्य करार (मेमोरँडम ऑफ कन्सल्टन्सी) केला आहे. चांदी उद्योगाच्या विकासासाठी शिवाजी विद्यापीठाकडे असणारे अद्यावत तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक महितीचा उपयोग करून व्यवसाय अधिक विकसित करण्यासाठी करार करण्यात आला आहे .

११) लघुउद्योग नोंदणी सुविधा – जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर यांच्या सहकार्याने हुपरी आणि परिसरातील चांदी उद्योगाची शासकीय लघुउद्योग नोंदणी संस्थेमार्फत केली जाते.

१२) वेब साईट सुविधा – संस्थेने हुपरी आणि परिसरातील चांदी उद्योगाच्या आणि दागिन्यांच्या माहितीची वेब साईट (www.silverclusterhupari.com) २ जुलै २०११मध्ये सुरू केली आहे. त्यामुळे येथील व्यवसाय आणि

दागिन्यांची संपूर्ण माहिती बाजारपेठेत प्रसिद्ध झाली आहे. निश्चितच जागतिक बाजारपेठ मिळण्यास मदत होणार आहे.

१३) चांदी पाटला कटिंग आणि नाणी एम्बॉसिंग मशिनची सुविधा – सर्व चांदी उद्योजक सभासदांच्या मागणींनुसार संस्थेमार्फत चांदी पाटला कटींग आणि नाणी एम्बॉसिंग मशिनची सुविधा २६ जानेवारी २०१६ पासून सुरू केली आहे. याचा लाभ हुपरी आणि परिसरातील चांदी उद्योजकांना होत आहे.

१४) चांदी सूत आणि पास्टा तापविण्याची सुविधा – चांदी सूत आणि पास्टा तापविण्यासाठी गॅस भट्टीची सुविधा माफक मजुरीवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये सर्व प्रकारच्या टंचाची आणि गेजची चांदी कलमे राख न पडता तापवून दिली जातात.

१५) हुपरी आणि परिसरात सुरू असलेला चांदी हस्तकला व्यवसाय हा विजेच्या नियमित उपलब्धतेवरच अवलंबून आहे. वीज पुरवठा खंडित होऊन उद्योजकाचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून वीज मंडळाकडे वेळोवेळी पाठपुरावा संस्थेमार्फत करण्यात येतो.

चांदी हस्तकला दागिने बनविण्याचे मजुरीचे दर –

असोसिएशनने ठरवून दिलेले मजूरीचे दर पुढीलप्रमाणे

अ. नं.	वर्ष	२१ गेज चांदी माल मजुरी (प्रति किलो)	२२गेज चांदी माल मजुरी (प्रति किलो)
१	२००८– ०९	१७० रुपये	३३० रुपये
२	२००९– १०	१७० रुपये	३३० रुपये
३	२०१३– १४	२१०रुपये	४२१ रुपये
४	२०१४– १५	२१०रुपये	४२१ रुपये

2) चांदी औद्योगिक सहकारी संघ लि. यशवंतनगर,हुपरी (4/4/1956) :

चांदी व्यवसायाकरिता लागणारा सर्व प्रकारचा कच्चा माल आणि चांदी माल उत्पादनाकरिता लागणाऱ्या सर्व प्रक्रिया एकाच छताखाली आणण्याच्या दृष्टीने हुपरीचे सहकारातील अग्रगण्य नेते श्री. यशवंत रामचंद्र नाईक यांनी ४/४/१९५६ मध्ये चांदी औद्योगिक सहकारी संघ स्थापन केला. ना नफा ना तोटा या तत्वावर येथील चांदी उत्पादकांना सर्व सोयी सुविधा जवळच उपलब्ध व्हाव्यात असा हेतु यामागचा होता. प्रती सभासद एक रुपया गोळा करून सभासदत्व दिले. त्यावेळी शंभर मूळ सभासद झाले. प्रत्येक महिन्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत क्रेडिटवर सभासदाने लागणारा माल न्यायचा आणि पुढील महिन्याच्या १०तारखेच्या आत त्या रक्कमेची संपूर्ण परतफेड करायची अशी या संघाची योजना होती. याचा फायदा येथील चांदी उत्पादकांना झाला. वाढती गरज लक्षात घेवून संघाने हुपरी गावात आणि जवळच असणाऱ्या पट्टणकोडोली गावामध्ये शाखा सुरू केल्या.

संघाचा स्वत:चा दागिने विभाग, आटणी दुकान, प्रेस विभाग (डाय विभाग), रॉकेल विभाग, गोल सूत मशीन (१७ ते २० गेज पर्यंतचे), चांदी व्यवसायाकरिता लागणाऱ्या कच्च्या मालामध्ये रसायने, जस्त, तांबे, उकाडा,तेजाब, पोटॅश याबरोबरच कात्री, पक्कड, हातोडे असे विविध उपयोगी वस्तु विक्रीस ठेवल्या. परगावाहून येणाऱ्या ग्राहकांना वेगवेगळ्या प्रकारची चांदीचे दागिने आणि वस्तु पहावयास आणि विक्रीसाठी सुद्धा संघाने सोय केली. एक विश्वासाच नात सभासद आणि संघामध्ये तयार झाले. यामुळे येथील चांदी उद्योगाला चालना मिळाली. १९७०ते ८० च्या दरम्यान दहा लाखापेक्षा अधिक वार्षिक उलाढाल येथे होती.

या व्यतिरिक्त हुपरीत धडी उत्पादक संघटना आणि इतर संघटनाही व्यवसायाच्या विकासासाठी कार्यरत आहेत.

3) चांदी माल उत्पादक सहकारी संघ (30/10/1960):

चांदी अलंकाराची निर्मिती सहकारी तत्वावर करण्याच्या उद्देशाने हुपरीतील मंडळींनी चांदी माल उत्पादक सहकारी संघाची स्थापना ३०/१०/१९६० मध्ये

केली. सामुदाईक प्रयत्नाने कमी खर्चात उत्पादन करता येईल आणि संघाने उत्पादित केलेला माल जिल्हा उत्पादक संघ किंवा इतर सहकारी संघामार्फत विकायचा, कामगारांना संघाचे भागीदार करून त्यांना नफा द्यायचा, अशी संघ स्थापनेमागची कल्पना होती. ९/२/१९६१ रोजी संघ सहकारी कायद्याखाली रजिस्टर करण्यात आला. चेअरमन आणि सात सदस्यांचे संचालक मंडळ नियुक्त करून प्रत्यक्ष कामास सुरूवात झाली.

पंचवीस रूपयांचा एक शेअर आणि एक रुपया प्रवेश फी भरून सुरूवातीस सदतीस सभासद झाले. १९६६ पर्यंत सभासद संख्या ब्यानव झाली. संघाच्या सभासदांना किफायतशीर दरात चांदी आटणी, सूत ओढणी अशी कामे कामे करून दिली जात होती. पैंजण, तोरड्या, आकडे, नेकलेस, ब्रासलेट इ. नमुन्याचे आकर्षक अलंकार तयार करून संघामार्फत विक्रीसाठी मुंबईला पाठविले जात होते. मुंबईमधील फोर्ट येथील खादी ग्रामोद्योग एम्पोरियममध्ये विक्रीसाठी ठेवले जात होते. मालाची विक्री करणाऱ्या सर्व सहकारी संस्था चांदीचे अलंकार विक्रीस ठेवत नसल्याने मालाचा उठाव होत नसल्याची त्यावेळी अडचण येत होती. हुपरीतील चांदी माल राज्य पातळीवरती नेण्याचा संघाचा प्रयत्न महत्वाचा होता.

4) यशवंत औद्योगिक रहिवासी वसाहत (1970) :

हुपरीच्या माळावर १९७० मध्ये यशवंत औद्योगिक रहिवासी वसाहतीची स्थापना करण्यात आली. धडी उत्पादक आणि कारागीर यांच्या काम करण्याचे ठिकाण आणि राहण्याचे ठिकाण एकच असावे या हेतूने ही वसाहत निर्माण झाली. व्यवसायाशी संबंधित अनेकांना येथे जागा उपलब्ध करून देण्यात आल्या. अशा प्रकारची त्यावेळची ही महाराष्ट्रातील एकमेव वसाहत होती.

5) एम. आय. डी. सी. (MIDC) आणि सिल्व्हर झोन, हुपरी :

कागल–हुपरी पंचतारांकित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ विकसित केले गेले. यातील जवळपास शंभर एकर क्षेत्र सिल्व्हर झोन म्हणून राखीव ठेवले गेले. ही जागा चांदी माल उत्पादकांना सवलतीला दिली गेली. येथे चांदीवर

विविध प्रक्रिया करणारे कारखाने आज उभा राहिलेले आहेत. हुपरी आणि परिसरामध्ये सुरू असलेल्या चांदी हस्तकला उद्योगाची भविष्यकालीन प्रगती आणि गरज लक्षात घेऊन आणि हा सर्व हस्तकला व्यवसाय एका ठिकाणी संघटित कार्यशील असावा या हेतूने संस्थेने कागल – हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहत मध्ये सिल्व्हर झोन निर्माण करून २००१ मध्ये या योजनेला सरकारने मंजूरी दिली. सिल्व्हर झोन हुपरीतील प्लॉट चांदी उद्योजकांना उपलब्ध करून देणेसाठी सहकार्य केले जाते. अधिकाधिक सोई सुविधा देता याव्यात यासाठी संस्थेने आपल्या मार्गदर्शनाखाली कार्य करणारी आणि संस्थेशी संलग्न असणारी सिल्व्हर झोन ज्वेलरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन या संस्थेची स्थापना २००८ मध्ये केली आहे.

६) सिल्व्हर क्लस्टर योजना (Silver Ornament Cluster) :

भारतातील अनेक ठिकाणे विशिष्ट उत्पादनासाठी खूप प्रसिद्ध आहेत. उदाहरणार्थ पैठण येथील पैठणी साडी, इलकल गावची इलकल साडी इ. अशा या वैशिष्टयपूर्ण उत्पादनात अनेक कारागीर गुंतलेले आहेत. या कारागिरांचे वैशिष्टय म्हणजे संपूर्ण कुटुंबच त्यासाठी काम करत असते. मात्र अलीकडच्या कालखंडात आर्थिक कारणांमुळे नवीन पिढी इतर व्यवसायाकडे किंवा कामधंद्यासाठी शहराकडे वळत आहे, असे होऊ नये, ही पारंपरिक कला जपली जावी यासाठी लघु आणि मध्यम उद्योगांसाठी क्लस्टर योजना राबवली जात आहे. या अंतर्गत उद्योगाच्या विकासासाठी सरकार विशेष मदत देते आणि खास सोयी सुविधा उपलब्ध करून देते. केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम मंत्रालयामार्फत (Micro,Small and Medium Enterprises) २०१० मध्ये समूह विकास योजना घोषित करण्यात आली. या अंतर्गत उपक्रमाच्या सर्वांगीण विकासाकरीता अनुदान देण्यात येते. यामध्ये क्षमतावृद्धी, सुविधा निर्मिती यांचा समावेश आहे. सामाईक सुविधा केंद्राअंतर्गत संशोधन व विकास केंद्र, पॅकेजिंग केंद्र, प्रशिक्षण केंद्र या बाबींचा समावेश आहे. त्याअंतर्गत हुपरीतील चांदी व्यवसायाचे क्लस्टर व्हावे यासाठी

जोरदार प्रयत्न सुरू आहेत. याबाबत प्रस्ताव सरकारला सादर करण्यात आला. हुपरीमध्ये चांदीच्या नवनवीन वस्तूंच्या डिझाईन आणि मार्केटिंग व्यवस्थेसाठी तंत्रशुद्ध प्रशिक्षणाची गरज आहे. त्याचबरोबर तयार होणाऱ्या मालाच्या बऱ्याचशा प्रक्रिया पारंपारिक पद्धतीने चालतात त्यामध्ये यांत्रिकीकरण गरजेचे आहे.

हुपरी येथे सिल्व्हर सेंटरची स्थापना करून आवश्यक निधी पुरवल्यास येथेही सुसज्ज कॉमन फॅसिलिटी सेंटर, डिझायनिंग सेंटर, ट्रेनिंग सेंटर, विविध आधुनिक यंत्रसामुग्री इ. गोष्टी करता येतील आणि समस्यांच्या गर्तेत सापडलेला हा उद्योग नवी भरारी घेऊ शकेल. रोजगाराच्या संधी वाढतील आणि येथील तरुणांना बाहेर जावे लागणार नाही. ही योजना पूर्णपणे अंमलात आणली तर चांदी व्यवसायाला निश्चितच झळाळी मिळेल. येथील व्यवसायाचे आधुनिकीकरण होऊन या व्यवसायाचा विकास होईल.

चांदी व्यवसायासमोरील समस्या:

हुपरीतील चांदी व्यवसायासमोर अनेक समस्या आहेत चांदी भावात होणारा चढउतार, औद्योगिक क्षेत्रात असलेले मंदीचे वातावरण, वारंवार होणारे लोडशेडिंग, व्यापारासाठी बाहेरगावी गेल्यानंतर चोरीची भीती किंवा पोलिसांकडून होणारा त्रास अशा अनेक समस्यांना या व्यवसायाला तोंड द्यावे लागत आहे. इतर व्यवसायातील कामगारांप्रमाणे चांदी कारागीरांना सोयी–सुविधा मिळत नाहीत. लहान उद्योजक मोठी भांडवली गुंतवणूक करू शकत नाहीत. या व्यावसायिक गुंतवणुकी बेभरवशाची असून कधी खूप फायदा मिळतो तर कधी खूप तोटा होतो. यामुळे मोठया उद्योगांची ऑर्डर पूर्ण करणे एवढेच काम केले जाते. व्यवसायातील अस्थिरतेमुळे या भागातील काही तरुण इतर क्षेत्रातील नोकऱ्यांकडे वळत आहेत. या व्यवसायाच्या वाढीसाठी सरकारच्या अनुदानाची, मदतीची व व्यावसायिक संरक्षणाची गरज आहे तरच हा वैशिष्टयपूर्ण चांदी हस्तकला व्यवसाय टिकेल व वाढेल. चांदी धातुचा समावेश वायदे बाजारात केल्यामुळे एकूण व्यवसायावर

त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. दरातला प्रचंड चढ–उतार या व्यवसायास खूप मारक ठरला आहे.

अशावेळी शासनाकडून हा वैशिष्टयपूर्ण असणारा उद्योग टिकविण्यासाठी विशेष प्रयत्न होत नसल्याचे इथल्या कारखानदारांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर स्त्रियांसाठी प्रशिक्षणाची विशेष आवश्यकता आहे. चांदी असोसिएशनकडून ज्वेलरी डिझाईनचे कोर्सेस आयोजित केले जातात पुरुषांबरोबरच महिलांनाही प्रवेश दिला जातोय. मात्र याची व्याप्ती म्हणावी तशी नाही. भारतात इतर ठिकाणी म्हणजे राजकोट सेलम येथे या व्यवसायाचे यांत्रिकीकरण झाले आहे. हुपरीत मात्र अजूनही हा व्यवसाय पारंपारिक पद्धतीने केला जातोय.

चांदीच्या दरातील चढ उतार :

गेल्या काही वर्षात चांदी दरात झालेले चढ– उतार खालीलप्रमाणे

अ. न.	वर्ष	चांदीचा प्रती किलो दर (रुपया मध्ये)	अ. न.	वर्ष	चांदीचा प्रती किलो दर (रुपया मध्ये)
१	२००६–०७	१६८००	६	२०११–१२	५६९००
२	२००७–०८	१९५००	७	२०१२–१३	५६२९०
३	२००८–०९	२३३५०	८	२०१३–१४	५४०३०
४	२००९–१०	२२२३०	९	२०१४–१५	४३४००
५	२०१०–११	२७२५५	१०	२०१५–१६	३७८२५

(संदर्भ –TaxGuru.in)

प्रकरण 4 थे

स्त्रियांचे चांदी व्यवसायातील योगदान

या प्रकरणात स्त्रियांचा चांदी व्यवसायातील सहभाग, त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या विविध प्रक्रिया, त्याचे स्वरूप,या व्यवसायाचे स्त्रियांना मिळणारे फायदे – तोटे, समस्या, काही कारागीर स्त्रियांच्या प्रतिक्रिया इ. गोष्टींचा आढावा घेतलेला आहे.

स्त्रियांचे चांदी व्यवसायातील योगदान

साधारणपणे ११५ वर्षापूर्वी हुपरी येथे चांदी व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि बघता – बघता व्यवसाय हुपरी आणि आसपासच्या गावातही पसरला. चांदीनगरी असेच हुपरीचे नामकरण झाले. हुपरीतील आजही अनेक कुटुंबे या व्यवसायातील कोणत्या ना कोणत्या प्रक्रियेशी निगडीत असलेली दिसतील. गहू, ज्वारीप्रमाणे वाळत घातलेले चांदीचे दागिने, शेणकुटांची पेटलेली भट्टी, दुपारच्या निवांतवेळी घराच्या अंगणात चांदीचे काम करत असलेल्या स्त्रिया असे चित्र आजही येथे पहायला मिळते. स्पर्धेच्या युगातही हुपरीने आपला नावलौकिक राखला आहे. हा व्यवसाय नावारूपाला आणण्याचे कार्य जसे चांदी व्यवसायिक –पुरुष चांदी कारागीरांनी केले त्याप्रमाणे ते स्त्री कारागीरांनीही केले आहे.

चांदी व्यवसायातील स्त्रियांचा सहभाग व कामाचे स्वरूप :

सुंदर, सुबक दागिने हुपरीचे प्रमुख वैशिष्टय. असे दागिने घडवताना एकूण सुमारे पंचवीस ते तीस वेळा वेगवेगळ्या प्रक्रिया केल्या जातात. कच्ची चांदी वितळवणे ते दागिने बनविणे अशा विविध प्रकारच्या कामांमध्ये कुशल, निमकुशल कारागिरांची आवश्यकता असते. त्यांच्याकडून विविध टप्प्यातील कामे पूर्ण करून चांदीपासून सुबक दागिन्यांची निर्मिती होते. यामध्ये बरीचशी कामे स्त्रियांकडून पूर्वीपासूनच केली जातात. १९५२ मध्ये साधारणपणे ५०० स्त्रिया व्यवसायात होत्या. व्यवसायात जशी गती आली तशी ही संख्या वाढत गेली.

चांदी व्यवसायाशी निगडित सुरुवातीच्या काळात माट्या भरण्यासाठी प्राथमिक स्वरूपाची कामे स्त्रियांकडे दिली जात. बाकी कौशल्याची कामे पुरुषांकडून पार पाडली जात. संसाराचा गाडा सांभाळत स्त्रिया दुपारच्या फावल्या वेळात काम करत. यासाठी विशेष अशी शिक्षण प्रशिक्षणाची गरज नसे. एकमेकींचे पाहून किंवा आईचे पाहून मुलीही काम शिकत. हुपरीतल्या मुली लग्न होऊन जात. गरजेप्रमाणे तिथेही हे काम त्या सवडीनुसार करत. विशिष्ट वजनाच्या माट्या दिल्या जात. स्त्रिया त्यांची साखळी करून देत. पुढच्या सर्व प्रक्रिया पुरुषांकडून केल्या जात असत. कालांतराने नाजूक कामे स्त्रियाकडून होऊ लागली. पुरुष कारागीरपेक्षा स्त्रिया अशी कामे काळजीपूर्वक आणि प्रामाणिकपणे करतात असे धडी उत्पादकही मान्य करतात. हुपरी जवळ पंचतारांकित एम.आय.डी. सी. ची उभारणी होत असल्यानं इथला तरुण पैसा अधिक मिळत असल्याने तिकडे आकृष्ट झाला. स्त्रियांनी हे आव्हानात्मक काम पेलले आहे.

अलिकडच्या काळात कौशल्याची इतर कामेही स्त्रिया करु लागल्या आहेत. विशेषत: साखळी–डिझाईन यांचे स्टोव्हच्या सहाय्याने जोडकाम करणे, मिनाकाम करणे अशी नाजूक कामेही स्त्रियांकडून होऊ लागली आहेत. पुरुष कारागीरांपेक्षाही स्त्रिया ही कामे जास्त चांगल्या रितीने करतात असा चांदी उद्योजकांचा अनुभव आहे. ही कामे स्त्रियांना घरी दिली जातात. स्वत:च्या सवडीनुसार ही कामे स्त्रिया पूर्ण करतात. पती फिरतीला गेल्यानंतर त्याची पत्नी चांदी कारखान्यातील विविध व्यवहार पाहते मात्र एखादा कारखाना पूर्णपणे स्त्रियांकडून चालविला गेलेला दिसत नाही. हुपरी येथील चांदी उद्योजक श्री. प्रशांत एकांडे व त्यांच्या पत्नी ऋता एकांडे यांनी बासष्ठ स्त्रियांना एकत्र घेऊन २००६ मध्ये खाजगी चांदी कारखाना सुरु केला. या कारखान्यात चांदी व्यवसायाशी संबंधित सर्व प्रक्रिया स्त्रियांकडून केल्या जात. स्त्रिया पूर्ण क्षमतेने काम करतात असा त्यांचा अनुभव आहे. मात्र त्यांना हा प्रयोग आर्थिक कारणांमुळे बंद करावा लागला.

मजुरीचे दर हे कामाच्या स्वरूपावर अवलंबून आहेत. सर्वात नाजूक काम म्हणजे जे वरावणे. या कामासाठी पंच्याण्णव ते एकशे पाच रुपये दिले जात. असे काम काही स्त्रिया एक दिवसात पूर्ण करतात. तर काहींना दोन दिवस लागतात. २०१० मध्ये गॅस व इतर खर्च वजा जाता यातून साधारणपणे सत्तर रुपये निव्वळ उत्पन्न मिळत होते. इतर कामाचे दरही नगावर अवलंबून होते. एकूण आढावा घेतला तर पूर्णवेळ काम करणाऱ्या स्त्रिया दररोज साठ ते सत्तर रुपये मिळवत होत्या. २०१५ मध्ये हा दर एकशे ऐंशी ते दोनशे रुपये इतका झाला. यातून साधारणपणे त्या स्त्रीस दररोज दीडशे रुपये इतकी मजुरी मिळू लागली.

हुपरीच्या आसपास तीस किलोमीटरच्या परिसरात चांदी व्यवसायिक भरणीची कामे तिथल्या स्त्रियांना नेऊन देतात आणि पूर्ण झाल्यावर साधारणपणे चार ते आठ दिवसात परत आणतात. रणदिवेवाडी, रेंदाळ, इंगळी, यळगुड, रांगोळी, पट्टणकोडोली, तळंदगे, तळंदगे फाटा सीमावर्ती कर्नाटकातील मांगुर, बारवाड या गावांचा प्रामुख्याने समावेश होतो.

हस्तोद्योग या स्वरुपात विकसित झालेला हुपरीतील चांदी व्यवसाय हा विशिष्ट जाती धर्मापुरता किंवा सोनारांपुरता मर्यादित राहिलेला नाही. जैन, मराठा, ब्राह्मण, मुस्लिम इ. जाती–धर्माचे स्त्री – पुरुष हा व्यवसाय आज करत आहेत. या व्यवसायामुळे अनेकांना रोजगार मिळाला आहे. पूर्वी चांदी कारागीर म्हणून काम करणारे अनेकजण चांदी उद्योजक बनले आहेत. या व्यवसायाचे स्वतंत्रपणे प्रशिक्षण घेण्यासाठी बाहेर जावे लागत नाही. घरातच या व्यवसायाचे प्रशिक्षण–ज्ञान व्यावसायिकांना मिळते. या व्यवसायातील स्त्रियांचा सहभागही खूप महत्त्वाचा आहे. मात्र त्यांच्या या योगदानाची म्हणावी तशी दखल घेतलेली दिसत नाही. पुरुष कारागीरांना अनेक सवलती मिळतात मात्र तेच काम करणाऱ्या स्त्रियांना अशा सवलती मिळत नाहीत. स्त्रियां व पुरुषांना जर चांगल्या दर्जाचे ज्वेलरी डिझायनिंगचे प्रशिक्षण दिल्यास जागतिक स्पर्धेला तोंड देऊ शकतील असे दागिने

इथे निर्माण होऊ शकतात. एकूण आढावा घेता भारताच्या हस्तकलेच्या विकासात हुपरीच्या चांदी व्यवसायाचे योगदान महत्त्वाचे आहे.

चांदी व्यवसायाचा स्त्रियांमुळे झालेला प्रसार –

चांदीचे दागिने बनवण्याच्या प्रक्रियेतील अनेक गोष्टी आज अनेक स्त्रिया, तरुण मुली अगदी सहजपणे करत आहेत. हुपरीतुन लग्न होऊन सासरी गेलेल्या अनेक मुलींनी त्यांच्या गावात हा व्यवसाय सुरू केला आहे आणि त्या यशस्वीपणे सांभाळत आहेत. हुपरीतील चांदी व्यवसायाशी असलेली त्यांची नाळ तुटलेली नाही. नाजूक आणि किचकट काम करण्याचे कसबही स्त्रियांनी सिद्ध केले आहे. यामुळे अनेक धडी उत्पादकांच्या मदतीने आपला व्यवसाय यशस्वीपणे पुढे नेत आहेत. हुपरीच्या अर्थचक्राला चालना देण्याचे काम त्यांनी केले आहे.

स्त्रिया करत असलेली कामे :

छुमछुम भरणी, तडे लावणे, माट्या भरणे, वाळे – तोडे लावणे, रूपाली – गजश्री भरणी, चटई पैंजण बांधणे, जोड पोगसणे, घागरी बांधणे, टिक्का लावणे, झाळकाम करणे, सेलम चेन – खुशबू पट्टी बांधकाम, कास्टिंग, नाकीवाली भरणी, ॲटिक मणी जोडकाम, पॉलिश, पास्टा तयार करणे, आटणी काम, पॉवर प्रेस चालविणे, मिना वर्क भरणे, दागिने पॅकिंगची कामे इ. वेगवेगळ्या प्रकारची कामे स्त्रिया करतात.

केर धुण्याचे काम करणाऱ्या स्त्रिया:

हुपरीतल्या कचऱ्यातही चांदी मिळते. धडी उत्पादक, आटणीवाले, तासकाम करणारे अशा अनेकांच्या कामाच्या ठिकाणी काम करताना चांदीचे छोटे छोटे तुकडे पडतात. ते गोळा करून पुन्हा वापरणे त्यांना शक्य नसते. त्यासाठी ते दुकानातील दररोजचा पडणारा कचरा गोळा करून ठेवतात आणि केरधुणी करणाऱ्या लोकांना ते विकतात.कचऱ्यातून चांदी बाजूला करून त्यावर गुजराण करणाराही एक वर्ग हुपरीत आहे. या कामाला केरधुणीचे काम असे म्हटले जाते. विशेषत: शेती नाही किंवा उत्पन्नासाठी इतर कोणताही व्यवसाय नाही अशा

वर्गाकडून पूर्वीपासून काम केले जाते आणि त्यामुळे तोच त्यांचा पारंपरिक व्यवसाय बनला आहे.

यात चांदी दुकानात, चांदी कारखान्यात किंवा आटणी जेथे काढली जाते अशा ठिकाणचा कचरा आणून, तो पाण्यात धुऊन त्यातून चांदी वेगळी काढली जाते. या कचऱ्यात चांदीबरोबरच इतर अशुद्ध गोष्टीही मोठया प्रमाणात असतात. असा कचरा मोठया घमेल्यात घेऊन तो पाण्यांमध्ये धुतला जातो. तरंगणारे पदार्थ बाहेर काढले जातात. असे सात ते आठ वेळा केल्यानंतर तळात उरणारा गाळ ज्यात चांदीच्या कणांबरोबरच इतर धातू, वाळू इत्यादी अनेक गोष्टी असतात. त्यातून दिसणारे चांदीचे कण, तुकडे बाजूला करून मुशीमध्ये घालून खार, सोडा यासारखी केमिकल्स वापरून तो विशिष्ट तापमानाला तापवून त्यांची आटणी काढली जाते. त्यातून चांदीचा पाटला (शुद्ध स्वरुपातील चांदी) तयार केला जातो. त्याची विक्री करून त्यातून त्यांची गुजराण चालते.

यासाठी हुपरीबरोबरच इतर ठिकाणावरूनही चांदी दुकानातून कचरा विकत आणला जातो. या सर्व प्रक्रिया पैकी कचरा विकत आणून घरच्या स्त्रियांकडे सुपूर्त करण्याचे कार्य पुरुष करतात. बाकी त्यातील पुढील सर्व प्रक्रिया स्त्रियांकडूनच पूर्ण केल्या जातात. अगदी आटणी काढण्याचे किचकट काम सुद्धा स्त्रियाच करतात. अगदी वयाची साठी उलटलेल्या या अशिक्षित महिलाही हे काम घरबसल्या करताना दिसतात. अशा स्त्रिया आणि त्यांचे पूर्ण कुटुंब हा व्यवसाय करते. अशी जवळजवळ ५० ते ६० कुटुंबे या गावात कार्यरत आहेत. केरधुणीचे काम गेली जवळपास चाळीस वर्ष करणाऱ्या सौ. सुमन भंडारे यांचे वय आज साठीच्या आसपास आहे. आजही त्या आणि त्यांच्या कुटुंबातील इतर स्त्रिया हे काम करत आहेत. त्यांच्या नातेवाईक असलेल्या सौ. भारती धोंगडे या आटणी काढण्याच किचकट कामही सहज करतात.

हे काम करताना त्या महिलांचा संपर्क कचरा, घाण पाणी यांच्याशी सातत्याने येतो. त्या घर कामाव्यतिरिक्तचा वेळ यातच घालवतात. मात्र एवढे सगळे करून

येणारे उत्पन्न तसे तुटपुंजे असते. काहीवेळा कचऱ्यातून जास्त चांदी मिळते तर काही वेळा खूप कमी. विशेषत: अलीकडच्या काळात चांदी कामासाठी मशिनचा वापर वाढला आहे. त्यामुळे चांदी वाया जाण्याचे किंवा कचऱ्यात सापडण्याचे प्रमाण कमी झाले आहे. सामाजिक मागास वर्ग म्हणून त्यांना काही फायदे मिळतात बाकी सरकारकडून कुठल्याही प्रकारची मदत मिळत नाही.

प्रातिनिधिक मुलाखती :

या लघु संशोधन प्रकल्पाच्या निमित्ताने हुपरी परिसरातील विविध प्रकारची कामे करणाऱ्या स्त्री कारागिराना भेटलो. त्यापैकी काहींच्या मुलाखती घेतल्या. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे

1) राखी संजय ठोंबरे, हुपरी

गेली चार वर्षे पैंजणाचे आकर्षक पॅकिंग करून देण्याचे काम राखी ठोंबरे करतात. राजकोट वरून विशिष्ट प्रकारचा पुठ्ठा आणि प्लास्टिक कव्हरिंग मागवले जाते. सुरूवातीला व्यापारी पॅकिंगसाठी त्यांच्याकडे माल आणून देतात. त्यानंतर विविध लांबीच्या पैंजणाचे (साडेचार इंच ते बारा इंच लांबीपर्यंत) जोड लावून घेतले जातात. उत्पादकाच्या नावाचा सिम्बॉल, पैंजणाची इंचामध्ये लांबी आणि त्याचे वजन असा टॅग तयार केला जातो. पुठ्ठयावर टॅग लावला जातो. या पुठ्ठयावर पैंजण स्टेपलरच्या साह्यांनी पॅक केले जाते आणि शेवटी प्लास्टिक पिशवीत ठेवून सील केले जाते. पॅकिंगवर दर लिहिला जात नाही. हा माल ज्या त्या उत्पादकांना किंवा व्यापाऱ्यांना परत दिला जातो. अशाप्रकारे पॅकिंग केलेला माल आकर्षक दिसतो, हाताळणीमुळे खराब होत नाही, गिऱ्हाईकाला माल दाखविणे सोयीचे होते. या सर्व प्रक्रिया महिलांच्या मदतीने हातानेच पूर्ण केल्या जातात. हुपरीच्या पैंजणांचे वैशिष्टय म्हणजे कमी वजनात अधिक डिझाइन्स मिळतात. सेलम, आग्राचे पैंजण फॅन्सी असले तरी त्याचे वजन जास्त असते त्यामुळे दर जास्त असतो यामुळे हुपरीच्या पैंजणना मागणी वाढत आहे. राखी

ठोंबरे यांच्याकडे व्यापारी लोक अर्जंट पॅकिंग करून मागतात. सध्या पाच महिला त्यांच्याकडे काम करतात. कुटुंबातील सदस्यही या कामी त्यांना मदत करतात.

2) सौ. रूपाली राजेंद्र चौगुले, हुपरी

गेली १४ वर्षे सुत मशीनमध्ये ओढणी आणि सूत गुंडाळण्याचे तुलनेने किचकट काम रूपाली चौगुले करत आहेत. प्रथम सूत मशीनमध्ये तार गोल केली जाते आणि त्याची स्प्रिंग बनविली जाते. या स्प्रिंगपासून पैंजणासाठी लागणाऱ्या कडी, फासा, माट्या हे तयार केले जाते. महिन्याला यातून त्यांना चार ते पाच हजार रुपये मिळतात. घरकाम करून फावल्या वेळात त्या हे काम करतात. कायमस्वरूपी काम मिळेलच याची खात्री नसते. पुरुषांच्या बरोबरीने आपण काम करू शकतो याचा त्यांना सार्थ अभिमान आहे. हुपरीतल्या ऐंशी टक्केहून जास्त महिलांना चांदी कामामुळे मर्यादित का असेना उत्पन्न मिळते आहे. दैनंदिन घरखर्चाला हातभार लागत असल्याचं त्या सांगतात.

3) सौ. सरिता ऱ्हायकर, हुपरी

गेली १५ वर्ष वरावणे लावणे, माट्या भरणे इत्यादी कामे सरिता ऱ्हायकर करतात. मालाच्या वजनावर त्यांना मजुरी मिळते. कामाला किती वेळ लावायचा हे त्या स्त्रीवर अवलंबून असते. फावल्या वेळेत हे काम केले जाते हे त्यामुळे बऱ्याचदा जास्त कालावधी जातो. चांदी दरातला चढ–उतार, तेजी –मंदीचा कामावर परिणाम होतो परंतु कामाच्या शोधात बाहेर जावे लागत नाही. घरबसल्या काम मिळते याचा त्यांना आनंद आहे. काम व्यवस्थित मिळाले तर मासिक दहा हजार पर्यंतचे उत्पन्न त्यांना मिळते.

4) सौ. अलका पोवार, हुपरी

हुपरीतील काही स्त्रियांनी उद्योजक म्हणूनही नाव कमावले आहे. पतीच्या बरोबरीने त्या या व्यवसायात सहभागी झालेल्या दिसतात. सौ. अलका पोवार या त्यापैकीच एक. त्यांच्या माहेरी या व्यवसायाशी संबंधित कुठलेच काम चालत नव्हते. सासरी मात्र हँडमेड ऑक्सिडाईज्ड व्हाईट मेटल ज्वेलरी व्यवसाय चालत

होता. त्यात त्या हातभार लावू लागल्या. सुरुवातीच्या काळात डिझाईन भरणे, झाळकाम करणे, पॉलिश करणे अशी कामे त्या करत. आता त्या दागिने जोडकामापासून ते पॅकिंगपर्यंतच्या अनेक गोष्टी सांभाळतात. सध्या त्यांच्याकडे पुरुष कारागिरांबरोबरच दहा महिला कारागीरही काम करतात. गेली तीस वर्षे पतीच्या बरोबरीने त्याही या व्यवसायात कार्यरत आहेत. आजमितीला या क्षेत्रातील उद्योजिका म्हणून त्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

5) सौ. वंदना वसंत शिंदे, यळगुड

गेली वीस वर्ष सौ. वंदना शिंदे या चांदी काम व्यवसायात आहेत. लग्नानंतर त्यांनी सासरी चालणाऱ्या व्यवसायात लक्ष घातले. पतीच्या कामात त्यांनी मदत करायला सुरवात केली. यातूनच त्या चांदी काम शिकत गेल्या. जोडाचे मापे काढणे, भरणी अशी कामे त्या शिकल्या. आता त्या स्वतच्या दुकानातील सर्व कामे पाहतात. गावातील पाच महिलांना देखील त्यांनी कायमस्वरूपी रोजगार दिला आहे. चांदीच्या व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल हुपरीतून आणून त्यापासून पक्का माल तयार करतात. आजच्या घडीला त्यांच्याकडे बॉल करदोडा, पैंजणाच्या विविध प्रकारामध्ये साखळी छुमछुम, सिंगल रूपाली, डबल गजश्री, रवा छुमछुम, सलग नाका छुमछुम, साखळी गुणमाला,घागरी, सेलम घागरी तयार होते. महिला कारागिरांना त्या दररोजच्या एका वरावण्याला दोनशे रुपये मजुरी देतात. चांदीचा भाव स्थिर राहील्यास ग्राहकाकडुन मागणी वाढते मात्र दरात मोठया प्रमाणावर चढ–उतार राहील्यास मागणी कमी झालेस कामावर परिणाम होतो असे त्यांनी सांगितले.

6) सौ. कल्याणी सचिन वनारसे, हुपरी

सौ. कल्याणी वनारसे या गेली चार वर्षापासून चांदी व्यवसायात आहेत. त्याही लग्नानंतरच चांदी काम शिकल्या आहेत. चांदीचे तोडे वाळे तयार करणे ही त्यांची खासियत आहे. त्यांच्या पतीनां त्या कामात मदत करतात. त्यांच्याकडे चांदीपासून पोकळ तोडे वाळे, तोडे वाळे फॅन्सी पैंजण तयार होते. लमाणी,

वंजारी समाजातून तसेच नागपुर भागातून अशा प्रकारच्या तोडे वाळे यांना अधिक मागणी असते. लहान मुलांच्या पायात तोडे वाळे घालण्याची पारंपरिक पद्धत असल्यानं लहान तोडे वाळे यांना अधिक मागणी असल्याच त्यांनी सांगितलं. त्या स्वत: चांदीच्या पाष्टयावर काकंदाच्या आणि नक्षीच्या मोळ्याच्या सहाय्याने हातोड्याचा वापर करून नक्षीकाम करतात. तोडा हा त्रिकोणी माट (आकार) असलेला असतो तर वाळयावर गोल आकाराची डिझाईन असते. हल्ली फॅन्सी मध्ये त्याला घुंगरू लावले जातात. त्यांना नऊ ते दहा हजार रुपये महिन्याला मिळतात.

7) सौ. सुजाता महादेव खोत, तळंदगे

सौ. सुजाता खोत गेली पंधरा वर्ष या चांदी व्यवसायात आहेत. सासरी आल्यानंतर त्या या व्यवसायाची कामे शिकल्या. सुरवातीच्या काळात टोपणे धुणे, माट्या धुणे, पाळ धुणे, पॉलिश करणे अशी कामे त्या शिकल्या. नंतर त्यांनी स्वत:चा व्यवसाय सुरू केला. त्यांच्या उत्पादनाच वैशिष्टय म्हणजे चाळ, कोयली (गजरा) तयार करणे. या कामासाठी त्यांच्याकडे दहा महिला कारागीर आहेत. आठवडयाला कामानुसार महिला कारागिरांना सरासरी पंधराशे रुपये मजुरी दिली जाते. चाळ, कोयली तयार करणारे अगदी बोटावर मोजण्या इतके कारागीर आहेत. त्यामुळे कामाची कमतरता जाणवत नसल्याचं त्या सांगतात. दहा किलो चाळ, कोयली तयार करण्यासाठी साधारणपणे आठ ते दहा दिवस लागतात. अशा प्रकारचा चाळची कर्नाटक राज्यात मोठया प्रमाणावर विक्री होते.

8) सौ. गिरीजा मंगेश पाटील. मांगूर ता. निपाणी जि. बेळगावी

सौ. गिरीजा पाटील गेली पंधरा वर्षापासून या व्यवसायात आहेत. चांदीचे भरणी काम करणे, वरावणे लावणे अशी कामे त्या शिकल्या आहेत. पूर्वीचा अनुभव असा काहीच नव्हता. लग्नानंतर पतीला कामात मदत करत त्या शिकल्या . पती धडी उत्पादक असल्यानं ते हुपरीहुन कच्ची चांदी घेवून येतात त्यानंतर ती वितळवून त्याच्या लगडया किंवा पट्टया तयार करतात. पाष्टा आणि तार तयार

करून त्यानंतर पैजण निर्मितीसाठी लागणारे साहित्याची निर्मिती केली जाते. या सर्व कामात त्या मदत करतात. घरचे काम जरी असले तरी दिवसाला त्यांची दोनशे रुपये मजुरी होते. डी. एड. पर्यंतच त्यांचं शिक्षण झाले असून नोकरी न करता त्या या व्यवसायातून त्या अर्थार्जन करताहेत.

९) सौ. ज्योती दीपक माळी, पट्टणकोडोली

ज्योती माळी या गेली तेरा वर्षापासून या व्यवसायासाठी काम करत आहेत. त्या प्रामुख्याने पैंजण जोडकाम म्हणजेच वरावणेचे काम करतात. त्यांच्या पतीचा हाच व्यवसाय आहे. त्यामुळे घरातील व्यवसायाची कामे त्या करतातच शिवाय बाहेरील चांदी व्यवसायिकांचीही त्या कामे करून देतात. ज्योती माळी यांची शेती आहे. शेतीकाम पाहत त्या हे काम जोडधंदा म्हणून करतात. पूर्णवेळ काम करणे परवडत नाही असे त्या सांगतात कारण मंदीच्या काळात काम कमी होते. घरचे सर्व काम करून त्या दुपारच्या वेळेत हे काम करतात. साधारणपणे वरावण्याची एक पाटी पूर्ण करायला चार ते पाच तास सलग बसावे लागते. महिन्याला साधारणपणे चार ते पाच हजार रुपये मिळतात. यातून घर खर्चाला मदत होते मात्र बचत करणे शक्य होत नाही. काम किती केले यावरच उत्पन्न अवलंबून असते.

१०) सौ. पद्मश्री सुरेंद्र बल्लोळे, हुपरी

गेली दहा वर्ष भरणी आणि वरावणेचे काम पद्मश्री बल्लोळे करत आहेत. घरातल्या कामाबरोबरच बाहेरच्या धडी उत्पादकांसाठी त्या काम करतात. पदवी पर्यंतचे शिक्षण झालेले असूनही नोकरी न शोधता यातूनच त्यांनी अर्थार्जन केले. चांदी भाव स्थिर राहिला तर मागणी वाढून कामही चांगले मिळते हा त्यांचा अनुभव आहे. त्यांच्या मते कोणतीही स्त्री अशी कामे शिकून पैसे मिळवू शकते.

एकूण आढावा घेता विविध प्रकारचे काम करणाऱ्या स्त्रियांचे उत्पन्न त्या दिवसभरात किती काम करतात यावर अवलंबून असते. स्त्रियांना घरची सगळी कामे करूनच या कामाकडे लक्ष द्यावे लागते. पुरुष कारागीर सकाळी आठ ते नऊ वाजता कामाला बसले की दुपारी एक ते दोन वाजेपर्यंत त्यांचे काम पूर्ण होते

कारण घरातील कामे त्यांना करावी लागत नाहीत. स्त्रियांना मात्र सर्व स्वयंपाक, धुणे भांडी इ. घरकाम आटोपूनच चांदी काम करावे लागते. प्रत्येक स्त्रीचा काम करण्याचा वेग वेगवेगळा असतो. त्यावर मिळणारे उत्पन्न अवलंबून असते.

या व्यवसायाचे स्त्रियांच्या दृष्टीकोनातून फायदे :

१) कमी शिक्षित किंवा अशिक्षित महिलाही कौशल्य प्राप्त करून अर्थार्जन करू शकतात.

२) घरबसल्या हे काम करता येते. नोकरीप्रमाणे बाहेर गावी किंवा नोकरीच्या ठिकाणी जाण्याची गरज पडत नाही.

३) घरकाम सांभाळत उरलेल्या वेळेत हे काम करता येते. मुलांना सांभाळणे हा नोकरदार महिलांसारखा गंभीर प्रश्न भेडसावत नाही.

४) स्त्री किंवा मुलींनी कामासाठी बाहेर न पाठविणाऱ्या परंपरावादी कुटुंबातील स्त्रियांना असे काम उपयुक्त ठरते आणि घरखर्चाला हातभार लागतो.

५) शिक्षण घेणाऱ्या मुली फावल्या वेळात हे काम करू शकतात. विशेषत: आर्थिकदृष्टया मागासवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी हे काम उपयुक्त ठरते.

तोटे :

१) चांदीमाल उत्पादकांकडून मिळणाऱ्या कामावर पूर्णपणे अवलंबून रहावे लागते.

२) चांदीच्या दरात चढ –उतार असतो. दरात अधिक वाढ झाल्यास ग्राहकांकडून खरेदी कमी होऊन मंदी जाणवते. अशा या मंदीच्या कालखंडात काम कमी मिळते.

३) आरोग्याच्या समस्या भेडसावतात.

४) मासिक पगाराच्या तुलनेत हे काम करणाऱ्या स्त्रियांना मजुरी पोटी मिळणारा पैसा कमी असतो.

५) पगाराप्रमाणे नियमित अर्थार्जनाची शाश्वती नाही.

६) कामगार म्हणून गणले जात नाही त्यामुळे त्यांच्याप्रमाणे पगारी सुटया, बोनस इ. फायदे मिळत नाही.

७) विवाह, बाळंतपण किंवा घरातील काही मोठी कार्ये यामुळे कामात खंड पडतो.

चांदी काम करणाऱ्या स्त्रियांना भेडसावणाऱ्या आरोग्य विषयक समस्या :

स्त्रियाद्वारे केले जाणारे काम हे बैठे काम असते. यामध्ये अत्यंत काळजीपूर्वक चांदी दागिन्यांच्या वेगवेगळ्या भागांची जोडणी हाताने करावी लागते. मात्र यामुळे महिलांना अनेक शारीरिक समस्यांनाही तोंड द्यावे लागते. प्रामुख्याने डोळ्यांचे आजार, कंबरदुखी, मानदुखी यांचा त्रास जास्त होतो त्यामुळे विशिष्ट कालावधीनंतर कामासाठी तासनतास बसणे त्यांना होत नाही. झाळकाम करण्यासाठी विशिष्ट प्रकारचा स्टोव्ह वापरला जातो. तो रॉकेलवर किंवा गॅसच्या सहाय्याने चालविला जातो. हे काम करणाऱ्या स्त्रियांना रॉकेलच्या धुराचा किंवा गॅसचा त्रास होतो. फावल्या वेळेत विश्रांती हा प्रकार त्यांच्याबाबत होत नाही कारण घरची कामे उदाहरणार्थ स्वयंपाक, धुणे, भांडी इत्यादी त्यांनाच करायची असतात.

स्त्रियांच्या अंगभूत कौशल्याचा वापर शास्त्रोक्त पद्धतीने उपयोग करून घेतला तर हुपरीच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी याचा फायदाच होईल. आधुनिक तंत्राचे प्रशिक्षण स्त्रियांना दिले गेले तर वाढत्या स्पर्धेचे आव्हान हुपरीतील चांदी उद्योग निश्चितच पेलू शकतो. हुपरी आणि परिसरातील स्त्रियांनी हे सिद्ध केले आहे. मदतनीस या भूमिकेतून स्त्रियांना काढून स्वतंत्रपणे कारागीर म्हणून त्यांचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे किंबहुना ती काळाची गरज आहे.

प्रकरण 5 वे

उपसंहार

उपसंहार :

भारतीय समाजातील बहुसंख्य स्त्रिया काम करतात ते आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारावी म्हणून. हुपरी आणि परिसरातील चांदीकाम करणाऱ्या कारागीर स्त्रियांही याला अपवाद नाहीत. चांदीमाल उत्पादनाच्या प्रक्रियेतील अनेक किचकट प्रक्रियाचे ज्ञान संपादन करून त्या आपले काम पूर्ण करत असतात. घरकामाची जबाबदारी सांभाळत त्यांनी केलेले हे काम कुटुंबाच्या आर्थिक उत्पादनात भर टाकणारे असते. प्रकल्पाच्या निमित्ताने या क्षेत्रात विविध प्रकारचे काम करणाऱ्या स्त्रियाची भेट घेऊन माहिती घेतली, त्यांच्याशी चर्चा केली. पुरुष धडी उत्पादक (चांदी माल उत्पादक) यांच्याशी चर्चा केली. यामुळे अनेक नव्या गोष्टींची माहिती मिळाली. गेल्या काही वर्षात हुपरी आणि परिसरातील चांदी काम करणाऱ्या स्त्रिया कारागिरांची संख्या वाढली आहे. यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे हुपरी आणि परिसरातील बरेच तरुण हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) मध्ये उपलब्ध असलेल्या नोकऱ्याकडे वळत आहेत यामुळे धडी उत्पादक किंवा चांदी व्यावसायिक त्यांच्या कामाची गरज ही स्त्रियांच्या मदतीने पूर्ण करत आहेत. काहींच्या मते सत्तर ते ऐंशी टक्के प्रक्रिया महिलाच पूर्ण करतात आणि हुपरीतील चांदी व्यवसाय यावरच तरतो आहे. नव्यानेच सुरू होत असलेल्या पंचतारांकित एमआयडीसी मध्ये सिल्व्हर झोन अंतर्गत अकराशे उद्योजकांना व्यवसाय उभारणीसाठी जमिनी दिल्या गेल्या आहेत. यामध्ये केवळ एका महिलेचा समावेश आहे. हे चित्र बदलले पाहिजे.

हुपरीतल्या स्त्रियांना आवश्यक असे प्रशिक्षण देऊन आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर झाला तर हुपरीतील दागिन्यांची कलाकुसर जागतिक पातळीवर पोहोचेल. पण त्यासाठी स्त्रियांकडे केवळ सहाय्यक म्हणून न पाहता कुशल कारागीर म्हणून

पाहणे व व्यावसायिकता येण्यासाठी स्त्रियांना आधुनिकतेची कास मिळणे ही काळाची गरज आहे.

निष्कर्ष :

१) सर्व जाती – धर्मातील, वेगवेगळ्या वयोगटातील स्त्रियांचा चांदी व्यवसायातील अनेक कामांमध्ये थेट सहभाग असतो. हा व्यवसाय विशिष्ट जात, वय, शिक्षण असलेल्यांपूरता मर्यादित राहिलेला नाही.

२) येथील महिला प्रमाणित कारागीर झाल्या पाहिजेत तर हुपरीला स्कील सिटीचा (Skill City) दर्जा प्राप्त होईल त्याचा फायदा येथील व्यवसायाला होईल.

३) स्वतःच विकसित झालेले विशेष आर्थिक क्षेत्र (Self Developd Special Economic Zone – SEZ) असे हुपरीचे वर्णन केले जाते. सरकारने सेझ खाली हे शहर आणले असते तर अधिक प्रगती झाली असती. गुंतवणूक वाढ, पायाभूत सुविधांचा विकास, रोजगार, निर्यात यामध्ये अजून वाढ झाली असती.

४) कोणत्याही शासकीय मदतीशिवाय हुपरीतील व्यवसायाची प्रगती झाली आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्न (G.D.P.) वाढवण्यात हुपरीचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. जीडीपीचा दर देशाच्या आर्थिक प्रगतीचे प्रतीक असतं जीडीपी दर वधारला तर आर्थिक विकासाचा दर उंचावला असे मानले जाते.

५) हुपरीतील चांदी व्यवसायाने देशभरात नाव कमविले आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे कार्य या व्यवसायामुळे झाले आहे.

६) कच्ची चांदी ते दागिने या प्रक्रियेतील अनेक महत्त्वपूर्ण कार्य हे स्त्रियांकडून केली जातात.

७) अनेक छोटया चांदी व्यवसायिकांची कामे त्यांच्याच घरातील स्त्रिया पूर्ण करतात. त्यामुळे बाहेरच्या कारागीरांना द्यावी लागणारी मजुरी वाचते. घरातल्या अर्थव्यवस्थेत तिचा हा सहभाग महत्वपूर्ण आहे.

८) अनेक स्त्रिया घरातील सर्व कामे आटोपून दुपारच्या फावल्या वेळेत चांदी काम करतात व पैसे कमावतात तर काही स्त्रिया पूर्णवेळ हे काम करतात. त्यातून त्यांची आर्थिक गरज भागविली जाते.

९) पूर्वी पुरुषांची मक्तेदारी असलेली अनेक नाजूक कामे उदाहरणार्थ पाळे भरणे, तड लावणे अशी कामे आता स्त्रिया करत आहेत. अनेक चांदी व्यवसायिकांना लागणारी कारागिरांची गरज यामुळे भागविली जात आहे.

१०) हुपरी जवळ एमआयडीसी विकसित होत आहे तेथे उभारल्या जाणाऱ्या मोठया उद्योगांकडे हुपरीतील तरुण वर्ग आकर्षित होत आहे त्यामुळे चांदी व्यवसायासाठी लागणारे मनुष्यबळ कमी पडत आहे. ही गरज भागवण्याचे काम आता स्त्रिया करत आहेत.

११) या व्यवसायात तेजी मंदीचे वातावरण सतत असते. मंदीच्या काळात स्त्रियांना मिळणारे काम कमी होते किंवा अजिबातच मिळत नाही. थोडक्यात वर्षभर उत्पन्नाची किंवा नियमित उत्पन्नाची शाश्वती यात मिळत नाही.

१२) ज्याप्रमाणे व्यावसायिकांची संघटना आहे आहे तशी स्त्री कारागीरांची कुठलीही संघटना नाही. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न झालेले दिसत नाहीत.

१३) सतत कराव्या लागणाऱ्या बैठया कामामुळे पाठीचे विकार अति नाजूक कामामुळे डोळ्यांचे विकार स्त्रियांना होतात

१४) स्त्रियांसाठी मर्यादित काळाचे ज्वेलरी डिझाईनिंगचे कोर्सेस चालवले जातात मात्र जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी आवश्यक असे मात्र प्रशिक्षण दिले जात नाही.

१५) स्त्रियांच्या क्षमतेचा पूर्ण वापर करण्याचे प्रयत्न हुपरीच्या चांदी व्यवसायात झालेली दिसत नाहीत. काही प्रयत्न आर्थिक कारणामुळे अयशस्वी झाले.

१६) सरकारकडून कोणत्याही प्रकारचे प्रोत्साहन किंवा अनुदान या क्षेत्रातील स्त्रियांना मिळत नाही.

१७) भविष्यातील यांत्रिकीकरणाचा परिणाम स्त्रियांना मिळणाऱ्या कामावर व मजुरीवर होऊ शकतो.

१८) या व्यवसायात काम करणाऱ्या स्त्रिया कुठलेही प्रशिक्षण घेत नाहीत. घरातल्या मोठया स्त्रियांचे काम किंवा शेजारी स्त्रियांचे काम बघून त्या हे शिकतात.

१९) पुरुष कारागीरांना आठवडयाची पगारी सुट्टी व इतर फायदे मिळतात मात्र घरी राहून तेच काम करणाऱ्या स्त्रियांना मात्र हे फायदे मिळत नाहीत.

२०) चांदी असोसिएशन मजुरीचे दर ठरवून देते मात्र सर्व खर्च वजा जाता मिळणारे उत्पन्न कमी असते. जे उत्पन्न घर खर्चासाठी हातभार लावणारे ठरते. मात्र त्यात खूप आर्थिक प्रगती होण्याची क्षमता नसते.

२१) सध्या चांदी कारागीरी करणाऱ्या अनेक स्त्रियांना लग्नापूर्वी या व्यवसायाची कोणतीही माहिती नव्हती. लग्न होऊन या भागात आल्यानंतर घरातल्या इतर स्त्रियांचे किंवा शेजारच्या स्त्रियांचे पाहून त्यांनी विविध कामे शिकून घेतली. मात्र आवश्यक प्रशिक्षण नसल्यामुळे नवे डिझाईन करणे त्यांना जमत नाही, बहुतेकजणी विशिष्ट पारंपरिक डिझाईनचेच काम करतात.

उपाययोजना :

१) घरात माल नेऊन चांदीकाम करणाऱ्या स्त्रियांनाही चांदी काम करणाऱ्या पुरुषांप्रमाणे कारागीरांचा दर्जा मिळाला पाहिजे.

२) चांदीकाम करणाऱ्या स्त्रियांची स्वतंत्र संघटना करावी त्यामार्फत त्यांच्या समस्यांची सोडवणूक करावी.

३) पूर्णवेळ हे काम करू इच्छिणाऱ्या स्त्रियांच्या प्रशिक्षणाची सोय केली जावी. विशेषत: ‘ज्वेलरी डिझाईनिंगचे प्रशिक्षण दिले जावे.

४) आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण त्यांना दिले जावे.

५) स्त्रियांना शाश्वत उत्पन्नाची हमी या व्यवसायातून मिळावी.

६) एकसारखे काम करणाऱ्या स्त्री चांदी कारागीर आणि पुरुष कारागीर यांच्या वेतनात फरक असू नये.

७) स्त्रियांच्या या अंगभूत क्षमतांचा या व्यवसायात पूर्ण वापर झाला तर निश्चितच या व्यवसायाच्या विकासासाठी त्याचा उपयोग होईल.

८) पुरुष आणि स्त्री कारागीरांची नियमितपणे आरोग्य तपासणी व्हावी.

९) देशांतर्गत आणि जागतिक पातळीवर कोणत्या प्रकारच्या चांदी दागिन्यांना किंवा इतर चांदी वस्तूंना मागणी आहे, त्याचा अभ्यास करून त्याच्या निर्मितीचे प्रशिक्षण स्त्री आणि पुरुष कारागीरांना द्यावे.

१०) चांदीच्या दागिन्यांची गुणवत्ता आणि दर्जा वाढविण्यासाठी आणि तो टिकविण्यासाठी चांदी उद्योगाशी संबंधित संघटनांनी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

११) चांदी दागीने आणि इतर वस्तूंच्या व्यापारात किंवा निर्यातीत सरकारी नियमांमुळे अडथळे येत असतील तर ते दूर करून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

१२) एकूणच चांदी व्यवसायात येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न झाले तर त्याचा चांगला परिणाम चांदी व्यवसायावर आणि कारागीर स्त्रियांवरही होईल.

१३) असंघटित कारागीरांच्या योजना येथे राबविणे आवश्यक आहे.

१४) विपणन (मार्केटिंग) च्या बाबतीत शासन लक्ष देत नाही, त्यामुळे पोलिसांकडून विशेषत: परराज्यातील पोलिसांचा खूप त्रास होतो. शासनाने संपूर्ण भारतभर या व्यापाऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

१५) गॅस भट्टी, पाष्टा मशीन यामध्ये आधुनिकता आणणे काळाची गरज आहे. कारागिरांना परवडतील अशा किमतीत मशीन उपलब्ध झाले तर व्यवसाय वाढीसाठी त्याचा फायदा होईल.

समारोप :

भारताच्या आणि जगाच्या इतिहासाचा आढावा घेताना प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत एक गोष्ट कायम राहिली आहे ती म्हणजे दागिन्यांची आवड. अगदी आदीमानवापासून ते आधुनिक मानवापर्यंत दागिने घालण्याची आवड जगातल्या सर्व संस्कृतीमध्ये जोपासली गेली. दगड –शंखशिंपले ते सोने –चांदी, हिरे–मोती इत्यादी मौल्यवान धातूपासून केलेले विविध प्रकारचे दागिने मानव तेव्हापासून वापरत आहे. आपादमस्तक म्हणजे पायांच्या बोटापासुन ते मस्तकावरील केसापर्यंत अनेक विविध प्रकारचे दागिने स्त्री आणि पुरुष वापरत, आपल्या लहान मुलांनाही घालत. याचे असंख्य पुरावे आज उपलब्ध आहेत. यामुळेच दागिने तयार करणे या कलेचे एका मोठया व्यवसायात रूपांतर झाले. चांदीच्या मौल्यवान धातूपासून दागिने निर्माण करण्यासाठी भारतातील काही शहरे खूप प्रसिद्ध झाली. त्यापैकीच महाराष्ट्रातील एक गाव म्हणजे हुपरी. चांदी दागिने निर्मितीची यशस्वी शंभर वर्षे पूर्ण केलेल्या या गावाने या क्षेत्रातला नावलौकिक आजही राखला आहे.

हुपरीतील केवळ एका कुटुंबाने सुरू केलेला हा व्यवसाय आज हुपरीतील शेकडो कुटुंबे करत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात छोटासा घरगुती हस्तोद्योग या स्वरूपात सुरू झालेला व्यवसाय बघता बघता वाढत गेला आणि संपूर्ण गावच या व्यवसायासाठी प्रसिद्ध झाले. यामुळेच आज हुपरी हे नाव घेतलं की पटकन डोळ्यासमोर येतात सुंदर चांदीचे दागिने आणि नाजूक कलाकुसर. काळाच्या ओघात स्पर्धा वाढत गेली तरीही हुपरीच्या चांदी व्यवसायाने आपली वैशिष्टये आणि गुणवत्ता टिकवून ठेवली आहेत. चांदी व्यावसायिक आणि कारागिरांनी अत्यंत मेहनतीने या व्यवसायाला नावारूपाला आणले. सुरुवातीच्या टप्प्यात इतर

व्यवसायाप्रमाणे या व्यवसायात पुरुषांचेच प्राबल्य राहिले. मात्र हळूहळू या परिस्थितीत बदल होत गेला आणि गरजेपोटी का होईना स्त्रियांचाही यातील सहभाग वाढत गेला. विशिष्ट कामापुरता मर्यादित असलेला या व्यवसायातील स्त्रियांचा सहभाग काळाबरोबर वाढत गेला आणि आज अनेक महत्वाच्या प्रक्रिया स्त्रिया पार पडत आहेत. अकुशल कारागीर ते कुशल कारागीर असा महत्त्वाचा टप्पा पूर्ण करत स्त्रियांनी या क्षेत्रातील आपले कौशल्य निर्विवादपणे सिद्ध केले आहे. मात्र या योगदानाची दखल आपल्या समाजाकडून तितकीशी घेतली गेलेली नाही. थोडक्यात येथेही दुय्यमच स्थान तिच्या वाटयाला आले. स्त्रियांचे सबलीकरण हा आजच्या समाजासमोरचे आव्हान आहे. अशा वेळी स्त्रियांनी योगदान दिलेल्या अशा विविध क्षेत्रांची ओळख करून घेणे आणि स्त्रियांच्या कार्यक्षमतेला अधिक चांगली दिशा देणे ही काळाची गरज आहे.

संदर्भ

१ महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर : कोल्हापूर जिल्हाए १९८९

२ जनगणना अहवाल : १९५१, १९६१, १९७१, १९८१, १९९१, २००१, २०११

३ बॉम्बे प्रेसिडेन्सी गॅझेटियर : कोल्हापूर जिल्हा खंड २४,१८८६

४ पाटील आप्पासाहेब (संपा.) महाराष्ट्राची कलानगरी हुपरी, राजवंती मासिक कोल्हापूर, ३०/१०/१९६६

५ कुलकर्णी पी. के., औद्योगिक समाजशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे, जुलै २०१५

६ आपटे ज. श., रोडे पुष्पा, भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे, फेब्रुवारी २०१२

७ कुळथे शिल्पा, महाराष्ट्रातील वैभवशाली दागिन्यांची परंपरा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९

८ गर्गे स. मा. (संपा.), भारतीय समाजविज्ञान कोश खंड ६, मेहता पब्लिकेशन, पुणे

९ देगलूरकर गो. ब. व इतर (संपा.) युगयुगीन करवीर इतिहास दर्शन, भारतीय इतिहास संकलन समिती कोल्हापूर, ऑक्टोबर २०१०

१० कोल्हापूर जिल्हयाचा सामाजिक–आर्थिक अहवालए २००५–०६

११ ठोंबरे आर. एन. (संपा.) स्वातंत्र्य संग्राम सैनिक गौरव ग्रंथ, स्वातंत्र्य संग्राम सैनिक संघटना हुपरी, २००३

१२ नवाझ मोदी, भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्रिया, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे २००८

१३ गर्गे स. मा., करवीर रियासत, श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर, २००३

१४ शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास १८३८–१८९४, निर्मिती विचारमंच कोल्हापूर, २००९

वार्षिक अहवाल, विशेषांक :

१ चांदी कारखानदार (उद्योजक) असोसिएशन हुपरी, वार्षिक अहवाल, वर्ष २००४–०५, २००८– ०९, २००९– १०, २०१३– १४, २०१४– १५

२ श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि, हुपरी, ६८वा वार्षिक अहवाल, २०१६–१७

३ कल्पवृक्ष सुवर्णमहोत्सवी विशेषांक, श्री पैसाफंड शेतकरी सहकारी बँक लि. हुपरी, ३ मे २०००

४ सदाअमृत : मान. श्री सदाशिवराव आप्पासाहेब नाईक अमृत महोत्सव गौरव ग्रंथ, अमृत महोत्सव गौरव समिती हुपरी, १०मार्च २०१४

५ संक्षिप्त टिप्पणी, श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँकेतर्फे प्रकाशित संक्षिप्त माहिती, २०१७

६ आई, उदे गं अंबाबाई ! श्री अंबाबाई गोंधळी कला, क्रीडा, सांस्कृतिक मंडळ, हुपरी, जानेवारी १९९९

७ चांदी औद्योगिक सहकारी संघ लि. हुपरी ६३ वा वार्षिक अहवाल, २०१८–१९

८ परिस : मा. पारिसाण्णा इंग्रोळे गौरव अंक, श्री. पारिसाण्णा भरमाप्पा इंग्रोळे सत्कार समिती हुपरी, १९८४

अप्रकाशित प्रबंध :

१ महादेव शिंदे, विसाव्या शतकाच्या विशेष संदर्भात कोल्हापूर शहरातील सुवर्ण व रौप्य उद्योगाचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, जून २०१०

२ आर. जी. घुले, कोल्हापूर जिल्ह्यातील मातृदेवता : ऐतिहासिक अभ्यास, यू.जी.सी. अनुदानित अप्रकाशित लघु शोधप्रबंध, ऑक्टोबर २०१५

मुलाखती

१ मानसिंगराव देसाई, (अध्यक्ष, चांदी माल उत्पादक संघ, हुपरी)

२ उदय वाशीकर (सेक्रेटरी, सिल्वर ऑरनामेंट असोसिएशन)

३ सुमन धोंडिराम भंडारे, (केरधूणी करणाऱ्या)

४ भारती मारुती धोंगडे, (केरधूणी करणाऱ्या)

५ अलका पवार (ऑक्सीडाईज दागिने निर्माण करणाऱ्या उद्योजिका)

६ सुरेश बल्लाळे (धडी उत्पादक)

७ मोहन खोत (चांदी उद्योजक)

८ प्रशांत एकांडे (चांदी उद्योजक)

९ सतीश भोजे (चांदी उद्योजक)

१० दुर्योधन भाऊसो भोजे (चांदी उद्योजक)

११ गणेश श्रीराम स्वामी (श्री अंबाबाई मंदिरातील प्रमुख पुजारी)

वृत्तपत्रे

१ दैनिक लोकमत, कोल्हापूर आवृत्ती, २० /८/२००७.

२ दैनिक लोकमत, कोल्हापूर आवृत्ती, ३०/४/२०१०

३ दैनिक लोकमत, कोल्हापूर आवृत्ती दिनांक: ३०/९/२०१३, कल्याणकारी मंडळात चांदी कारागिरांचा समावेश हवा

४ दैनिक लोकमत, कोल्हापूर आवृत्ती दिनांक: २०/८/२०१७, लेख: चमचमणारी हुपरी

५ दैनिक महाराष्ट्र टाइम्स, कोल्हापूर आवृत्ती दिनांक : २/७/२०१५, लेख : क्लस्टर योजना लालफितीत

६ दैनिक महाराष्ट्र टाइम्स, कोल्हापूर आवृत्ती दिनांक : १५/८/२०१६, लेख : हुपरीच्या चांदीची चमक

७ दैनिक महाराष्ट्र टाइम्स, कोल्हापूर आवृत्ती दिनांक : २/१/२०१७ लेख : चंदेरी नगरीची अर्थ वाहिनी

८ दैनिक पुढारी कोल्हापूर आवृत्ती दिनांक : २/१/२०१६,
लेख : चांदी उद्योगामुळे हुपरी परिसरातील दौड

९ दैनिक पुण्यनगरी, इचलकरंजी आवृत्ती दिनांक : ३०/१/ २०१०

१० दैनिक सकाळ, कोल्हापूर आवृत्ती, दिनांक : ६/४/१९९२,
लेख : जेंव्हा हुपरीची चावडी जाळली

११ दैनिक सकाळ, कोल्हापूर आवृत्ती, दिनांक : २८/९/ २०१०

१२ मासिक किर्लोस्कर, दिवाळी विशेषांक, नोव्हेंबर १९५१,
लेख : महाराष्ट्रभूमीचे मौल्यवान लेणे हुपरी

१३ मासिक अर्थसेवा, कोल्हापूर , मे २०१०,
लेख : दागिने निर्मितीतील मजुरीच्या कार्यपद्धती

१४ साप्ताहिक जनदबाब, दिनांक : १/३/२००८, इचलकरंजी,
लेख : नवसाला पावणारी श्री अंबाबाई देवी

१५ साप्ताहिक लोकप्रभा दिवाळी विशेषांक २०१४, लेख : चांदीचा गाव

१६ साप्ताहिक सत्यवादी कोल्हापूर, दिनांक २०/६/१९४५,
लेख : नमुनेदार गाव हुपरी

वेबसाईट

१ www.silverclusterhupari.com

२ www.dcmsme.gov.in

३ www.TaxGuru.in

Questionnaire of Minor Research Project

History of Silver Industry in Hupari with Special reference to Women's Contribution

हुपरीतील चांदी व्यवसायाचा इतिहास : विशेष संदर्भ महिलांचे योगदान

डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले.
सहयोगी प्राध्यापक,
चंद्राबाई - शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी
फोन नं. ९८२३९७८९९५

१) चांदी काम करणाऱ्या महिलेचे नाव - --

पूर्ण पत्ता व फोन नं. --

----

२) वय - ---------------------

३) शिक्षण - **प्राथमिक / माध्यमिक / पदवी / व्यवसायिक शिक्षण / अशिक्षित**

४) घरचा व्यवसाय - ---

५) चांदी व्यवसायाशी संबंधित करत असलेले काम १) ....

(उदा. भरणी, माट्र्या भरणे इ.) २) ....

३) ....

४) ....

६) चांदी व्यवसायात काम करणाऱ्या आपल्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या ....

७) चांदी व्यवसाय घरातला आहे की बाहेरच्या व्यावसायिकासाठी काम करता ? ....

....

८) यातून मिळणारे मासिक उत्पन्न ....

९) मिळणारे उत्पन्न पुरेसे आहे का ? ....

१०) येणाऱ्या अडचणी - ....

(कामाबाबत , मजुरीबाबत इ.) ....

....

....

....

११) कामाबद्दल आपल्या अपेक्षा ....

....

....

....

१२) कामगार म्हणून आपली नोंद आहे का ? होय / नाही

असलेस कोणाकडे ....

१३) दिवाळीला बोनस अगर इतर कोणते फायदे मिळतात का ? ....

१४) व्यवसायाशी संबंधित आपले अनुभव - ....

....

....

....

....

....

....

सही

हुपरीच्या किल्यातील विस्तीर्ण पटांगण आणि श्री अंबाबाईचे देवालय
१९६६

पूर्वीचा मंदिर परिसर



आजचा मंदिर परिसर

वज्रलेपापूर्वीची श्री अंबाबाईची मूर्ती

सध्याची श्री अंबाबाईची विलोभनीय मूर्ती

चांदी कारखानदार (उद्योजक) असोसिएशन, हुपरी

हुतात्मा स्मारक , हुपरी

श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि. हुपरी

दीडशे वर्ष पूर्ण करणारी केंद्रीय प्राथमिक शाळा

घागरी



वरावणे



चटई पैंजणात घागरी गुंफताना

रूपाली , गजश्री वरावणे करताना स्त्रिया

मशीनच्या सहाय्याने जोडकाम करताना

भरणी करताना

सूत मशीनवर काम करताना

मशीनवर तासकाम करताना

सेलम मशीनवर टिक तोडताना

सेलम गुणमाला तयार डिझाईन

सेलम गुणमाला तयार डिझाईन

वरावणे



अँटीक माळ जोडकाम

अँटीक मंगळसूत्र, लप्पा, बाजूबंध

संशोधक चर्चा करताना

अँटीक दागिने जोडकाम



अँटीक गजरा

अँटीक नमुने

हुपरीत तयार केले जाणारे वाळे तोडे नमुने

केरधुणीचे काम करताना

केरधुणीतून मिळालेले चांदीचे तुकडे

संशोधक चर्चा करताना

ळ कडी

ळ

ळ कडीत भरलेली घागरी

पैंजनाचे प्रकार - सेलम, बॉम्बे पायल , हुपरी पायल



तयार पैंजण पॅकिंग करताना

पॅकिंग केलेले पैंजण

तयार पैंजण पॅकिंग करताना स्त्रिया आणि पॅकिंग पैंजण

देव्हाऱ्यात वापरल्या जाणाऱ्या चांदीच्या विविध वस्तु

देव्हाऱ्यात वापरल्या जाणाऱ्या चांदीच्या विविध वस्तु

ऑँक्सीडाईज्ड दागिने

हुपरीत तयार होणारे विविध प्रकारचे पैंजण

गुणमाला नाकेवाली

रूपाली साधी आणि नाकेवाली

गजश्री साधी आणि मीना

रूपाली छुमछुम

गजश्री छुमछुम मीना